# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| कार्यकारी संपादक | : | श्री. मोहन पाठक |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००२ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ३६ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**


**गणपत्रिका क्रमांक : ५३**

AAR 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा



वर्ष दुसरे / अंक २ / जानेवारी २००२

## संपादकीय

काळाची गती अगम्य आहे. नवीन वर्ष सुरू झालं असं म्हणे म्हणेपर्यंत पुन्हा नवीन वर्ष सुरू होतयं ! या नवीन कॅलेंडर इअरच्या निमित्ताने दिशा वाचणाऱ्या वाचकांना व सर्व संबंधितांना दिशा तर्फे हार्दिक शुभेच्छा.

या कॅलेंडर वर्षात अनेक संकल्प आपण केले असतील ते यशस्वी ठरावेत. नवीन काही वाचण्याचा संकल्प करा, त्याबरोबरच जुनं चांगल साहित्य वाचायचं राहिल असेल तेही वाचायचा संकल्प करा. रामदास स्वामींच्या दासबोधाचा उल्लेख परवा एके ठिकाणी मी केला. तो 'दिसामाजी' वाचकांना सांगतो. रामदास स्वामींनी फक्त वाचा असे सांगितले नाही तर लिहायलाही सांगितलं. दिशामाजी काही तरी ते लिहावे/ प्रसंगी अखंडित वाचीत जावे असं त्यांच सांगण होत. या क्रिया रेसिप्रोकल आहेत. एकच क्रिया परिपूर्ण नाही. त्यामुळे वाचनाच्या संकल्पानाबरोबर लिहिण्याचा संकल्प करा. दिवस भरातला आठवड्यातला एखादा अनुभव लिहून काढा, त्यावर विचार करा. लेखक जन्मावा लागतो हे मर्यादित अर्थाने खरे आहे, पण म्हणून बाकींच्यांनी लिहायचेच नाही असे नाही. तेव्हा आपणस पुनः(पुनः) नम्र आवाहन आहे लिहा, दिशाकडे पाठवा. हे व्यासपीठ 'विचार करणारांसाठी' आहे. विचार करू इच्छिणाऱ्यांसाठी आहे. तेव्हा अनेक संकल्पात हा एक संकल्प करायला विसरू नका !

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष दुसरे / अंक २ / जानेवारी २००२

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर

**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर

**कायदेविषयक सल्लागार**
ॲड. सलिल बुटाला

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | हा देश चाललाय तरी कुठे ? | कु. शिल्पा लक्ष्मण पाटील | ३ |
| २) | नैराश्यशोभा | श्री. अरविंद दोडे | ४ |
| ३) | शालेय बेशिस्त - कारणे व उपाय | श्री. प्र. द. अरदकर | ७ |
| ४) | व्यवसायाच्या नव्या दिशा : मॉडेलिंग, ॲंकरिंग, मिडिया पर्सन वगैरे वगैरे .... | ओंकार वर्वे | १० |
| ५) | प्रदर्शन भरविण्याचा एक वेगळा अनुभव | दीपाली सुरते | १२ |
| ६) | वाचक प्रतिसाद | श्री. ह. श्री. परांजपे | १३ |
| ७) | इंधन वाचवण्यासाठी : भाग १ | श्री. वि. ना. कोपरकर | १४ |
| ७) | राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय | कु. मेधा हेमंत खरे | २१ |
| ८) | मनाचा विकास व ईश्वरभक्ती | डॉ. सौ. गीता कुलकर्णी | ३० |
| ९) | पुनर्जन्म, अफगाणिस्तानचा ! | श्री. वासुदेव देशपांडे | ३१ |
| १०) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक/मैत्रेयी शेवडे | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# हा देश चाललाय तरी कुठे ?

*समृध्द परंपरेचा आपला देश आपण कोठे घेऊन चाललो आहोत याचा विचार अस्वस्थ करतो. असेच अस्वस्थ स्पंदन व्यक्त करणारं टिपण. - संपादक*

भारतभूमी ही परशुरामाची भूमी, शूरांची भूमी, वीरांची भूमी म्हणून या जगात प्रसिद्ध आहे.

सुवर्णभूमी अशी ख्याती आहे. साऱ्या जगाच्या नजरा या भूमीवर पूर्वीपासून खिळल्या आहेत. मध्य अशियातून आर्य या भूमीवर आले. सप्तसिंधूच्या परिसरात विसावले. वेद निर्माण झाले. महाकाव्य जन्माला आली. जग जिंकण्याच्या महत्त्वाकांक्षेने आलेल्या सिकंदरला पुरूने सीमेवरून परत जा म्हणून सांगितले.

श्रीकृष्णाची, श्रीरामाची पुण्यभूमी हीच सम्राटांची मालिका येथेच निर्माण झाली. सम्राट अशोक, चंद्रगुप्त, अकबर, महामुनी व्यास, नारद, वाल्मिकी येथेच जन्मले. छत्रपती शिवरायांनी हिंदवी स्वराज्य याच भूमीत निर्माण केले.

पण आज या राष्ट्रात दहशतवाद सुरु झालाय. आमच्यातील काही माथेफिरु या देशाचे तुकडे करु पाहतायत. पंजाब, काश्मीर, आसाम वेगळे करु पहात आहेत. विघटनवादी लोक देशाचे तुकडे करु पहात आहेत. स्वातंत्र्याच्या वेदीवर ज्यांनी रक्त सांडले त्यांचे स्मरण कोणालाच नाही.

जगाला मानवता व लोकशाहीचा आदर्श देणारा देश, त्याच देशाला आज तस्करांचा विळखा बसला आहे. राष्ट्र उखडून टाकण्यासाठी दाऊतासूर बॉम्बस्फोट करीत आहेत.

एक धर्म दुसऱ्या धर्माच्या जोरावर उठला आहे. मग देशाचे काय ? तो कुठे चालला आहे ? याचा विचार कोण करतो ? या राष्ट्राचा खरा धर्म एकच - 'मानवता'. सत्यम्, शिवम्, सुंदरम् हीच या देशाची जीवन प्रणाली आहे.

रशियातील कार्ल मार्क्सचा साम्यवाद लेनिन सकट गाडला गेला. आमच्या देशात निधर्मी राष्ट्रवाद आम्हाला खंबीरपणे उभा करायचा आहे. देशात प्रांतवाद, सीमावाद, पाणीवाटपवाद आम्हीच निर्माण केलेत.

या देशाची इंग्रजांनी केलेली फाळणी, स्वातंत्र्यानंतर झालेली फाळणी याचा साकल्याने विचार केल्यास देश नेमका कुठे चाललाय याचा विचार युवकांनी केला पाहिजे.

तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभा असलेला भारत उद्याची महासत्ता बनेल अशी वाटचाल आपण केली पाहिजे.

ही भूमी परशुरामची आहे.

**कु. शिल्पा लक्ष्मण पाटील**

माजी विद्यार्थिनी,

बांदोडकर महाविद्यालय, ठाणे.

•••

# नैराश्यशोभा

*नैराश्यातही शोभा असते हे ऐकायलाही विसंगत वाटेल पण त्यामागील तत्त्वज्ञान काय आहे हे हा लेख वाचून कळेल - संपादक*

वेदमाता श्रीशारदेस श्रीसमर्थांनी 'नैराश्यशोभा' का म्हटलंय ? तिच्यामुळेच महंताना शांती मिळते. ती गणेशाची बीजशक्ती आहे. ज्ञानी व्यक्तींच वैराग्य तिच्याचमुळे आहे. नैराश्याची शोभा तीच !

नैराश्यातून वैराग्य कसं लाभतं ? हे एक कळू शकतं. पण निराशेचा जो धक्का बसतो, तो अत्यंत तीव्र असतो. निराशेमुळे आपल दुःख तर चिघळतच, आपली दुर्बलताही वाढते. एवढंच नाही तर निराशेमुळे दुष्ट लोक धीट बनतात. असंही म्हणतात की, भेकडाला निराशेमुळे धीर चढतो. अशी घोर पीडा देते निराशा ! सर्वत्र तिच्यामुळे आपली शोभा होते ! इथं तर समर्थांनी श्रीशारदेला चक्क नैराश्यशोभा म्हटलंय, असं कसं ?

थोडा इतिहास पाहिला तर काय दिसतं ?

साने गुरुजींनी आत्महत्या केली. का ? निराशेपायी. विदेशी, जगप्रसिध्द लेखक अर्नेस्ट हेमिंग्वेनं 'नोबेल' पुरस्कार मिळवला. पण अखेर काय झालं ? त्यानं, आता आपल्याला काही लिहिता येत नाही, हे दुःख असह्य झाल्यानं आत्महत्या केली. ही झाली आधुनिक उदाहरण, परंतु प्राचीन इतिहासात काय दिसतं ? सीताहरणानंतर रामानं वनवासात जो विलाप केला तो बघून झाडावेलींनाही रडू कोसळलं. वेदनेची तीव्रता एवढी असू शकते का ?

निराशेला आमंत्रण द्याव लागत नाही !
आणि तिला झोप लागली असेल तर उठवू नये.

तो उठली आणि आपल्या हृदयाच्या महाद्वारी आलीच तर काय करावं ?

साने गुरुजींना क्रांतिकाळात तुरुंगवासात विनोबांचा भरपूर सहवास लाभला. गीता प्रवचनं त्यांनी सांगितली. गुरुजींनी लिहून घेतली. एका संताच्या संगतीतही त्यांची निराशा विवेकपथावर त्यांना नेऊ शकली नाही अन् अनर्थ घडला. महाराष्ट्र एक मातृहृदयी लेखकास कायमचा अंतरला, तोही अकाली, अवेळी. मराठी माणूस हे दुःख कधीही विसरणार नाही. गुरुजींच्या आत्महत्येची कारणं काही वेगळी असतीलही, परंतु अंतिम सत्य हेच उरतं की -

'ना प्रपंच, ना परमार्थ
अवघे जिणेचि झाले व्यर्थ
अविवेके अनर्थ
ऐसा केला ॥'

गुरुजींनी समाजाचा प्रपंच पाहिला. देशभक्तीचा परमार्थ केला. परंतु अविवेकानं अनर्थ घडविला आणि...देश एका समाजसेवकास गमावून बसला.

या उलट हेमिंग्वेची कथा !

अफाट परिश्रमानं स्थैर्य मिळवलं. प्रेम केलं. लग्न केलं. संसार थाटले. पैसा, प्रसिध्दी, कीर्ती... सारं काही मिळवलं. एका थोर लेखकाला जे जे हवं असतं, ते सारं काही. जगप्रसिध्द लेखक अत्यंत नैराश्यानं ग्रासला गेला अन् वेडाच्या भरात आत्मघात करून बसला ... असं का

झालं ? उत्तर तेच - 'अविवेके अनर्थ । ऐसा केला ॥''
अशा या विवेकाचा अर्थ कळला की जन्म व्यर्थ जात नाही. दुःखावाचून कुणाचाही एक दिवसही सुना जात नाही. आणि सुख ?

तेच तर मानण्यावर असतं ! अर्थात आपल्या इच्छाशक्तिवर ! पण होतं काय की, इच्छाशक्तिपेक्षा आपण सुखावरच अवलंबून राहतो, म्हणून ते लाभत नाही.

जागतिक कीर्तीच्या दहा साहित्यिकांत हेमिंग्वे आजही मानानं नावाजला जातो. त्यानं पुरे पुरे म्हणावं इतकी सुखं त्याला लाभली होती. प्रकृतीनं साथ देणं सोडलं तसा तो आतून ढासळत गेला. लिहिणे बंद म्हणजे जगणचं बंद असा त्याचा न्यूनगंड वाढत गेला. सुख हे निश्चित कोणत्या गोष्टीमुळे लाभतं, ते फार कठीण आहे सांगणं. कारण, दारिद्र्य आणि संपत्ती यांनाही याबाबतीत अपयश आलयं! सुखातूनही नैराश्य येऊ शकतं, ते असं.

इथंच गरज असते विवेकाची ! हे कळायला मात्र हवं. नैराश्याला वैराग्याकडे वळवणं हाच विवेक.

' परि हेंचि जो बोळखें जगीं ।
तो विवेकिया ॥ '

असं ज्ञानोबारायांनी म्हटलंय. दुःख सहन करून माणसाला शहाणपण येतं. जितका विवेक अधिक तितका जगातल्या तामस गोष्टींचा ताप अधिक. तो सहन करणं हेच तप ! त्यातून स्वतःला पैलू पाडणं हे थोरपण.

'नैराश्यशोभा' केवळ सरस्वतीदेवीलाच समर्थांनी म्हटलंय असं नाही, तर विविकानं साधलेलं वैराग्य हेही असामान्यच ठरतं...अन् जे असामान्य ते शोभिवंत असतंच. शोभा ही चिरंतन असल्यानं कुणालाही भावतेच. वाक्‌सिध्दी लाभते ती त्यातूनच. उदास विचारे वेच करी । असं व्यवहाराबाबत समर्थवचन आहे. मग चेहऱ्यावरची तटस्थतासुध्दा नक्कीच तनाला आणि मनाला शोभून दिसते... नैराश्याकडून एवढं तरी आपण शिकावं. रात्री नर्मदा ओलांडून गेला. पैलतीरावर असलेल्या एका साधुपुरुषाच्या झोपडीत. त्यांचा प्रणय त्यानं पाहिला. त्याला धक्काच बसला. आत्महत्या करायला तो निघाला, अन त्याचं नैराश्य पालटलं कालिदासानं ! सरस्वती असाही प्रसाद देते !

दुसरं उदाहरण आहे भर्तृहरीचं. या भर्तृहरी राजाचं एका नर्तकीवर मनापासून प्रेम होतं. तिचा संबंध मात्र एका सारथीशी होता. राजाला हे कळलं तेव्हा त्यानं आपलं राज्य धाकट्या विक्रमास दिलं अन् तो वैरागी झाला ! नवनाथा मधला एक श्रेष्ठ नाथ ठरला. त्यानं नंतर आपल्या अभ्यासानं वैराग्य, शृंगार आणि नीती या तीन विषयांवर तीन शतक लिहिली ती जगप्रसिध्द आहेत. हे कसं घडलं ? नैराश्यातून ज्ञान आणि वैराग्य लाभतं ते असं! म्हणून माऊलींनं म्हटलंय,

संसारव्यथे फिटला ।
जो नैराश्ये विनटला ॥

नैराश्याचा अंहकार असा शोभा देतो, त्या अलंकाराचं सौंदर्य मात्र विवेकानं जाणून घ्यायला हवं.

खरं तर आपल्यापुढे आशेचं गाजर असतं. ते मिळालं तर नशीब उत्तम असं आपण म्हणतो. नाही मिळालं तर ? आपले प्रयत्न कमी पडले असं का नाही म्हणत ? कारण आपल्याला कमीपणा नको असतो. ही गोष्ट खरीच आहे की आशा ही गरिबाची भाकरी असते. गांजलेल्यांची एकमेव औषधी असते... आशा म्हणजे जागेपणीचं स्वप्न असतं . मानवी जीवनाचा तीच मुख्य आधार. आशेनं दिलेल्या प्रीतिभोजनाला कुणी नकार नाही देत.. पण हेही लक्षात घ्यावं लागतं की, आशेचा अतिरेक म्हणजे फसवणूक स्वतःची दुसरी बाजू सांगायची झाल्यास, आशेचा पाठलाग करतो, ती त्याला कधी सोडत नाही. आशेचं पंख कापले की ती कुठं जात नाही. सारांश, जो आशेवर जगतो तो उपाशी मरतो !

महाभारतातील ऋषभगीता ही तर आशेची क्षुद्रता ह्याच विषयावर आहे. तीत ऋषभमुनींनी म्हटलंय, माणूस मृगया करतो. मृगाला बाण लागतो. तरी तो धावत राहतो अन् शिकारी माणूस कुठंतरी मृग कोसळून पडेल म्हणून त्याचा पाठलाग मरेपर्यंत करत राहतो. ह्यातील मृगराज म्हणजे आशेचं प्रतिकच आहे. आशेपायी तन आणि मन कृश होतात, असंही पुढे म्हटलंय.

थोडक्यात, आशा ही न्याहारीला ठीक पण भोजनाला तिचा काय उपयोग ? नैराश्यातून विवेकानं साथ दिली तर समाधानाची किरणं मनातल्या हिरवळीवर कायम राहतात. आपल्यात देवगुण कमी, दैत्यगुण अधिक असतात. भगवंतानं गीतेत म्हटलंय, दैत्यांमध्ये प्रल्हाद मी आहे आपल्याला प्रल्हाद होणं कठिणच ! आशा सोडणं अशक्य...नैराश्य आपल्या पाचवीला पुजलेलंच. ह्या गुंत्यातून बाहेर कसं पडावं ? आशेला निःस्वार्थपणे लोकहिताकरिता राबवावं. अर्थात आधी प्रपंच मग परमार्थ साधावा. निराशा पदरी पडणारच नाही, अशी आशा धरावी.

'समूळ फळाशा त्यागूनी ।
निर्विकल्प, निरभिमानी ।
जो लागे स्वधर्माचरणी ।
तैं रज, तम दोन्ही जिणे सत्त्व ॥''

श्री. अरविंद दोडे
शालन भोईर वाडी,
खोपट, ठाणे ४००६०१

• • •

## ❖ शॉर्टहॅण्ड ❖

शॉर्टहॅण्ड हा एक जलद गतीने लिहून घेण्याचा लिपीचा प्रकार आहे. या लिपीचा शोध डॉ. टिमोथी ब्राइट या गृहस्थाने १५८८ मध्ये लावला. १५८८ मध्येच त्याने शॉर्टहॅण्ड कसे शिकावे या विषयावर पुस्तकही लिहिले.

'चार्लस डिकन्स' हा जगप्रसिध्द कादंबरीकार. हा चार्लस डिकन्स पूर्वी वार्ताहर म्हणून गाजला होता. १५ व्या वर्षीच त्याने शॉर्टहॅण्ड कलेत प्राविण्य मिळविले. शॉर्टहॅण्ड लिपीत अचूक लिहिण्यावद्दल **चार्लस डिकन्सची** ख्याती होती.

## *संकल्प नवीन वर्षातला*



**झाडे लावा**

**झाडांची काळजी घ्या**

**झाडे जगवा**

**- संपादक**

# शालेय बेशिस्त - कारणे व उपाय

*आजचा विद्यार्थी बेशिस्त आहे असं प्रत्येक पिढी येणाऱ्या पिढीला म्हणत आहे. या बेशिस्तीचे स्वरुप, कारणे व उपाय सांगणारा हा लेख - संपादक*

पूर्वीची शालेय शिस्तीची संकल्पना आणि आताची संकल्पना यांमध्ये महदंतर आहे.

बेशिस्तीवर उपाय म्हणून शारीरिक शिक्षा (Corporal Punishment) करणे केव्हाच मागे पडले आहे. छडी लागे छम् छम्, विद्या येई घम् घम् चा काळ केव्हाच मागे पडला आहे. आदरयुक्त भीती किंवा भीतीयुक्त आदर याचा मागमूसही उरलेला नाही. कारण आता शिक्षण विद्यार्थी केंद्रित झालेले आहे. विद्यार्थी हा संपूर्ण शैक्षणिक प्रक्रियेचा केंद्रबिंदू आहे.

**आजच्या शालेय बेशिस्तीचे स्वरुप**

आजकाल कुठलाही शिक्षक वर्गामध्ये Pin-drop silence ची अपेक्षा करणार नाही. कारण शैक्षणिक प्रक्रिया ही दुहेरी प्रक्रिया आहे. त्यामुळे दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग हा असणारच. त्यामुळे वर्गामध्ये चर्चा, प्रश्नोत्तरे अपेक्षित आहेतच. हल्लीचे अध्यापन Activity Oriental असल्यामुळे वर्गात थोडीफार गडबड होणार हे गृहीत धरलेले आहेच. परंतु बऱ्याच वेळा असे आढळून येते की, विद्यार्थ्यांचे शिक्षकांच्या शिकविण्याकडे लक्ष केंद्रित झालेले नसून आपापसात बोलण्यामध्ये त्यांना अधिक रस असतो. दुसरे म्हणजे काही विद्यार्थी शालेय मालमत्तेचे नुकसान करतानाही आढळून येतात. त्यांना शाळा आपली वाटत नाही. शाळेबद्दल आपुलकीच्या भावनेचा अभाव आढळून येतो. तिसरी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे शिक्षकांबद्दलची अनादराची भावना. विद्यार्थी आपापसात बोलताना बऱ्याच वेळा शिक्षकांचा एकेरी उल्लेख करताना आढळतात. काही विद्यार्थी तर शिक्षकांचा टोपणनावाने उल्लेख करताना आढळतात. या सर्व शालेय बेशिस्तीचे मूळ कशात आहे?

**शालेय बेशिस्तीची कारणे**

१) वाढती विद्यार्थीसंख्या हे शालेय बेशिस्तीचे एक प्रमुख कारण आहे. हल्ली शहरांमधून प्रत्येक वर्गामध्ये सरासरी ७० ते ८० विद्यार्थी असतात. एकेका बाकावर ३-३ विद्यार्थी बसविले जातात. त्यातून विद्यार्थ्यांची चुळबुळ, एकमेकांना धक्का लागणे, त्यातून भांडणे, कंपासपेट्या वगैरे पडून वर्गातील शांततेचा भंग होणे इ. प्रकार घडतात.

२) दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे क्लासेसचा वाढता प्रभाव. आजकाल शहरांमध्ये ९० % विद्यार्थी कुठे ना कुठे शाळेव्यतिरिक्त शिकवणीला जात असतात. त्यामुळे विद्यार्थी शिकविण्याकडे शाळेतही धड लक्ष देत नाहीत की क्लासमध्येही धड लक्ष देत नाहीत. विद्यार्थी शिक्षकांच्या अध्यापनाकडे मन एकाग्र करून, रस घेऊन लक्ष देताना दिसत नाही.

३) एकंदरित संपूर्ण समाजामध्येच वडिलधाऱ्या माणसांबद्दलची आदराची भावना दिवसेंदिवस कमी होत चालल्याचे आपल्याला आढळून येते. घरातील पालकच कित्येकदा आपला बॉस, इतकेच नव्हे मुख्यमंत्री, पंतप्रधान, राष्ट्रपती यांचा देखील उल्लेख अनादराने, एकेरी करताना विद्यार्थी ऐकतो. काही शिक्षक देखील आपल्या सहकारी शिक्षकांचा उल्लेख विद्यार्थ्यांशी बोलताना अनादराने करताना आढळून येतात. ह्याची परिणती कशात होणार ?

४) सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे प्रचलित शिक्षण पध्दती आणि परीक्षा पध्दती. प्रचलित शिक्षण पध्दतीमध्ये तीन 'H' पैकी Head (बुद्धी) वर अवास्तव भर, असून Hand (हात) आणि Heart (मन) या उरलेल्या दोन वर पुरेसा भर दिला जात नाही किंबहुना त्यांना गौण महत्त्व दिले जाते. साहाजिकच परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विषयांनाच अवास्तव महत्त्व दिले जाते. कला, क्रीडा, सहशालेय उपक्रम, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास ह्या गोष्टींकडे दुर्लक्ष केले जाते. आपली परीक्षापध्दती स्मरणशक्तीवर आधारित आहे. ह्या परीक्षा पध्दतीमध्ये लेखनतंत्राला अधिक महत्त्व आहे. त्यामुळे संपादित ज्ञानाची किंवा त्याच्या उपयोजनाची परीक्षा न होता केवळ स्मरण शक्तीचीच परीक्षा होते. त्यामुळे सर्वच विद्यार्थी परीक्षेमध्ये चांगल्या प्रकारे यशस्वी होऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्यामध्ये नैराश्य निर्माण होते.त्यांच्यामध्ये नैराश्य निर्माण होते. ते वैफल्यग्रस्त होतात. आपली शिक्षणपध्दती जीवनविन्मुख आहे. अभ्यास क्रमातील विषयांची प्रत्यक्ष जीवनाशी कुठेही सांगड घातलेली नाही. त्यामुळे त्याची उपयुक्तता विद्यार्थ्यांना पटत नाही. स्वाभाविकच त्यांच्या अध्ययनामध्ये विद्यार्थ्यांना रस वाटत नाही.

शालेय बेशिस्तीचे पूर्णपणे निराकरण करणे शक्य नसेल तरी तिचे प्रमाण कमी करणे, ही शिक्षकांच्या हातातील गोष्ट आहे. शिक्षकांनी देखील काही पथ्ये पाळणे, काही बंधने स्वत:वर घालून घेणे आवश्यक आहे.

**शालेय बेशिस्तीवरील उपाय**

१) शिक्षकांनी वर्गात वेळेवर जाणे ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे. आपली वेळापत्रकातील नियमित तासिका असो किंवा Arrangement Period असो, शिक्षकाने वर्गावर वेळेवर गेलेच पाहिजे. आधी ऑफ पीरिएड असल्यास शिक्षक आपली तासिक सुरू होण्यापूर्वी संबंधित वर्गावर दोन मिनिटे आधी जाऊ शकतो. म्हणजे आधीच्या शिक्षकाचा पीरिएड, संपल्यावर तो लोच त्या वर्गावर जाऊ शकेल. एका वर्गावरून दुसऱ्या वर्गावर जायचे असल्यास पीरिएड संपल्यावर जास्तीत जास्त पाच मिनिटांच्या आत त्या वर्गावरील आपले युनिट दुसऱ्या वर्गावर शिक्षकाने गेलेच पाहिजे. दोन तासिकांच्यामध्ये बराच वेळ शिक्षक वर्गावर नसल्यास वर्गात बेशिस्त वर्तन होण्याची शक्यता असते. शिक्षक वर्गावर वेळेवर गेल्यास बेशिस्तीला काही प्रमाणात निश्चितच आळा बसू शकतो.

२) शिक्षकांनी सांगितलेले कुठलेही काम करायला मुलांना आवडते. परंतु तसेच महत्वाचे सयुक्तिक कारण असल्याशिवाय शिक्षकाने विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे वैयक्तिक किंवा शालेय काम सांगू नये. वर्गावर जाताना कॅटलॉग, खडू, डस्टर, नकाशे, कंपासपेटी इ. शैक्षणिक साहित्य शिक्षकाने स्वत:च घेऊन जावयास हवे. निबंधवह्या, प्रयोगवह्या, प्रगतीपुस्तके यांची ने आण करण्यासाठी सेवक वर्गाची मदत आवश्यक तेथे घेता येईल.

३) शिक्षकाचे निरीक्षण विद्यार्थी करत असतात. विद्यार्थी संस्कारक्षम आणि अनुकरण प्रिय असतात त्यामुळे शिक्षकाचे कपडे, त्याचे चालणे, वागणे, बोलणे आदर्श आणि शिक्षकी पेशाला साजेसे असले पाहिजे. शिक्षकाने आपल्या मनाचा तोल केव्हाही ढळू देऊ नये. अर्वाच्य भाषा, शब्द यांचा वापर कटाक्षाने टाळावा. आपल्या सहकारी शिक्षकांबद्दल अनुदार उद्‌गार काढणे, त्यांचा एकेरी उल्लेख करणे ह्या गोष्टी कटाक्षाने टाळाव्यात.

४) शिक्षकाने अध्यापन करत असताना शैक्षणिक साहित्याचा वापर आवर्जून करावा. आपले अध्यापन अधिक परिणामकारक आणि रोचक करावे. विज्ञान शिक्षकांनी प्रयोग शाळेचा वापर जास्तीत जास्त करावा.

५) शिक्षकाने वर्गात मागील बेंचवर बसणाऱ्या विद्यार्थ्यांकडे (Back Bench) देखील लक्ष दिले पाहिजे.

त्यांना प्रश्न विचारून उत्तरे देण्यास प्रवृत्त केले पाहिजे, प्रोत्साहित केले पाहिजे.

६) शिक्षकाने एखाद्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे उत्तर चुकल्यास त्याला नाउमेद करावयाचे नाही. तुला अजिबात डोकेच नाही हा विषय तुला या जन्मात यावयाचा नाही असे शेरे कधीही मारू नयेत.

७) वर्गात बेशिस्त वर्तन करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच वर्गमॉनिटर किंवा वर्गप्रतिनिधी बनवून त्यांच्यावरच वर्गातील शिस्तीची जबाबदारी टाकावी. ह्याचा बराच वेळा चांगला उपयोग होतो असे आढळून येतो.

८) विविध क्रीडास्पर्धा, प्रदर्शने, हस्तलिखित, भित्तीपत्रिक, स्नेहसंमेलन इ. सहशालेय उपक्रमांचे आयोजन करावे. त्यामुळे ज्यांना अभ्यासात गती नसते, परंतु ज्यांच्याकडे विविध कलागुण असतात, त्यांच्या गुणांना वाव मिळतो.

९) विद्यार्थ्यांना केवळ वर्गातच डांबून न ठेवता अधून-मधून खेळ, कवायत, शालेय परिसर स्वच्छता, कथाकथन समूहगायन इ. विविध उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे.

१०) शिक्षकाने आपले अध्यापन हसतखेळत, अधूनमधून विनोदाची पेरणी करत रोचक बनविले पाहिजे. शिक्षकाला विद्यार्थ्यांबद्दल आपुलकी, प्रेम, आस्था, कळकळ आहे हे त्याच्या शिकवण्यातून विद्यार्थ्याला जाणवले पाहिजे.

शालेय वास्तूची शाळेतील विविध सुविधांची, शालेय परिसराची काळजी घेण्याची जबाबदारी अंतिमतः विद्यार्थ्यांचीच आहे हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मनोमन पटवून दिल्यास त्यांना शाळेबद्दल आपुलकीची भावना निर्माण होईल. तसेच शिक्षकांबद्दल प्रेम आणि आदर निर्माण झाल्यास, त्यातूनच विद्यार्थ्यांची बेशिस्तीकडून स्वयं शिस्तीकडे शिस्तबध्द वाटचाल होईल अशी आशा वाटते.

श्री. प्र. द. अरदकर
सहशिक्षक
श्रीरंग विद्यालय, ठाणे.

## भोजनाबद्दल

भोजन झाल्या झाल्या निजू नये असे शास्त्रात सांगितले आहे. भोजन निजण्यापूर्वी निदान दोन तास आधी करावयास हवे. तरच अन्नपचन नीट होते. अन्यथा गॅसेस, ॲसिडीटी यासारखे विकार होतात.

भोजनानंतर शतपावली करणे आवश्यक आहे. भोजन झाल्या झाल्या बैठे काम करू नये. त्यामुळे स्थूलता वाढते.

भोजनासंबंधी असे बरेच नियम अनुभवांतून सिद्ध झाले आहेत. 'शास्त्र असे सांगते' या ग्रंथात याबद्दल खूप माहिती आहे. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील या ग्रंथाचा दाखल अंक आहे. SC-1973

# व्यवसायाच्या नव्या दिशा : मॉडेलिंग, ॲंकरिंग, मिडिया पर्सन वगैरे वगैरे ....

आजचं युग जाहिरातींचं आहे. जाहिरातींनी केवळ T. V. सारखं मोठं प्रसारमाध्यमच झपाटलेलं नाही. जळी-स्थळी, काष्ठी-पाषाणी या जाहिराती आपलं अस्तित्व दाखवताना आढळतात. एखाद्या उत्कंठावर्धक कार्यक्रमात जाहिरातींचा Break जेव्हा होतो तेव्हा राग तर येतो पण जाहिरातींचे गुलाम झालेले आपण लगेच शांतही होतो. पण ही झाली आजची गोष्ट. The most current issue. पण मी लहान होतो तेव्हा इतके ब्रेक्स होते का ? खरं सांगायचं तर आम्हाला तेव्हा दूरदर्शनाशिवाय दुसरा Channel माहितीही नव्हता. मात्र गेल्या पाच-दहा वर्षांत केवल विज्ञानं घडवलेल्या बदलांत आज T. V. वरती Channels च्या गर्दीत दूरदर्शन शोधावं लागतंय.

विषयांतर झालयं खरं मात्र नव्या करीअर मध्ये न विसरता उल्लेख करावा असं क्षेत्र Advertising चं आहे असं मला मनापासुन वाटतं. म्हणुन हा धावता उल्लेख, असो. आजचा तरुण Career minded झालाय हे आज साऱ्यांनीच मान्य केलयं. साधी आपल्या लहानपणीची गोष्ट आठवूया. घरी आलेल्या पाहुण्याने '' मोठेपणी कोण होणार?'' असं विचारलं की ठराविक उत्तर देऊन मिळणाऱ्या खाऊची वाट बघायची असा आपलाही नियम होताच की! पण कालांतराने वाढत्या वयाने आम्हाला समाजातली आदराची, निंदेची स्थानं दाखवली. कुणाबद्दल कुणाला काय वाटतं हे शिकवलं. नवी स्वप्नं घेऊन आलेल्या युवावस्थेनं एखादं आदराचं स्थान आपल्यातही निर्माण व्हायला हवं अशी इच्छा दिली. येऊ घातलेलं तारुण्य याच Career कडे एक अस्मितेचा अस्तित्वाचा प्रश्न म्हणून बघायला लावलं.

पापा कहते हैं बड़ा नाम करेगा
बेटा हमारा ऐसा काम करेगा
मगर ये तो कोई न जाने
के मेरी मंझिल है कहां

हीच द्विधा मनस्थिती आज युवकाला सतावते आहे.

पूर्वी मात्र असं निश्चितच नव्हतं. गावं होती, बारा बलुतेदार होते. पोटापाण्यापुरतं मिळवुन सारी जणं सुखी होती. 'स्वतःचा व्यवसाय' ही काळाची गरज नव्हती आणि आज बरोबर उलट परिस्थिती आहे.

काही म्हणा, समाजावर एखाद्या व्यक्तीचा, प्रवृत्तीचा प्रभाव असतो. या अनुशंगाने मतं बनत जातात. दृष्टीकोन घडत जातो आणि या साचेबद्ध विचारातुन बाहेर पडायला सहसा समाज तयार नसतो. स्वातंत्र्यपूर्व काळातला समाजावरचा स्वातंत्र्यवीरांचा प्रभाव आठवा. नंतरच्या देशांतर्गत राजकारणावरचा नेहरु, इंदिरा गांधींसारख्या व्यक्तींचा प्रभाव आठवा. पण या राजकीय, सामाजिक बदलांच्या पलीकडे एक विश्व उभं राहत होतं. त्याचं नाव 'चित्रनगरी'. पृथ्वीराज कपुर, साहेबराव मोदींपासून थेट आजच्या ऋतिकपर्यंत साऱ्यांनीच स्वतःभोवती एक प्रसिद्धीचं वलय निर्माण केलं. आणि या मायाजालात कायमच अडकत गेला तो त्या त्या काळातला तरुण. ७०-८० च्या दशकातला 'जंजीर' चा काळ आठवा. अमिताभला स्टार बनवणारा तो काळ आठवा म्हणजे माझं उदाहरण तुमच्या लक्षात येईल.

पण आजचा तरुण कशानं प्रभावित झालाय? एकीकडे वाढती Competition, जगण्यासाठी जीवघेणी स्पर्धा, संघर्ष; काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द, कमी पडणारी संधी, जीवनातलं न संपणारं Struggle, तर दुसरीकडे या Star, Super-stars चं मस्त आयुष्य, 'आपल्याला जमेल ते' असा कुठेतरी वाहणारा विश्वास, या द्विधा मनस्थितीतला युवक कळत-नकळत या चंदेरी दुनियेकडे ओढला जातो आहे. आपल्यामधले Talents, त्यांची Market-Value आणि याचवेळी साऱ्या समाजाला भेडसावणारी बेकारी त्याला Modeling चा एक Career म्हणुन विचार करायला लावते आहे. Glamour च्या या दुनियेकडे त्याला बोलावते आहे. आमच्या आधीच्या पिढीने जेव्हा बेल-बॉटम च्या पँट घातल्या तेव्हा त्यावर झालेली टिका आठवा. तीच Fashion आज नवा साज लेवुन स्वतंत्र अस्तित्वाच्या शोधात आहे. एवढंच नाही तर Dress Designing, Choreography, Event Management, Drama Schools यासारख्या कधी काळी दुर्लक्षिल्या गेलेल्या गोष्टी आज एक स्वतंत्र व्यवसाय होऊ पाहताहेत.

Modeling नवं असलं तरी Anchoring मात्र नवीन नाही. ५०चं दशक बघितलेल्यांना एक गोष्ट विचारु इच्छितो, की त्यांनी त्यावेळच्या बुधवारची रात्री ८ ते ९ ही वेळ कशी घालवली? सदाबहार गाणी आणि अमिन सयानी यांचा तितकाच सदाबहार आवाज यांची जादु काही औरच होती. ते दिवस आठवा. कदाचित तेव्हाही युवकांनी अमिन सयानी व्हायचं स्वप्नं पाहिलं असेल. पण दुर्दैवाने स्वप्नाला सत्यात उतरवण्याची किमया ते करू शकले नाहीत.

आजचा युवक आणि विशेषत: मराठी युवकही या नव्या Career मधे प्रगती करतो आहे. Anchoring मधे मुकुंद फळसळकर, गोविंदासारखी मराठी माणसं आहेत. Modeling मधे मिलिंद सोमण, पॅरिस गाजवणारी उज्वला राऊत अशी अनेक मराठी माणसं मराठी अस्मिता जपताहेत. अदिती गोवित्रीकर सारखी मॉडेल मराठीला वैश्विक स्तरावर नेत आहे.

आजचा युवक डॉक्टर, वकील, इंजिनिअर यासारखे पठडीतले व्यवसाय सोडुन Modeling सारख्या नव्या व्यवसायांकडे वळतो आहे; हे बघून आनंद वाटतो पण कधीकधी दु:खही वाटतं. आनंद एवढ्यासाठी की अपयश देणाऱ्या, देऊ शकणाऱ्या परीक्षांच्या वाटेला न जाता, त्यातुन येणाऱ्या Frustration ला दूरवरच ठेऊन युवक नवी क्षेत्रं पादाक्रांत करतो आहे. खरंच काहीतरी नवं करू पाहतो आहे. आणि दु:ख इतक्यासाठीच की तो वाहवत जातो आहे. करीअरच्या नावाखाली व्हल्गॅरिटी वाढते आहे. 'FTV' सारखे Channels नव्याने अस्तित्वात येताहेत. शिक्षणाच्या वेळी पाठ्या टाकण्याचा प्रयत्न होऊ पाहतोय. हे सुद्धा कुठेतरी थांबायला हवंय ना !

शेवटी इतकचं सांगावसं वाटतं की Fashion ही सवय होण्यापुर्वी, त्याचा 'एक बदल म्हणुन स्विकार व्हायला हवा. 'आज आहे ते उद्या नाही' हे तत्त्व शिकवणाऱ्या जीवनाकडे ज्या खोलवर बघितलं जातं तेवढ्यं याही गोष्टीकडे बघुया. नव्याचा स्विकार करतानाच जुन्यालाही सांभाळून ठेवुया. प्रत्येक नवी गोष्ट चांगुलपणाच्या कसोटीवर पारखुन घेऊया. Fashion आणि आमच्या अस्थिर आयुष्याचा समांतर रेषेतला प्रवास समजुन घेऊया. प्रगती आणि बदल यात आपणच अंतर पाडुया. Ramp वरुन चालण्याची सवय लागलेल्या तरुणाला एवढंच सांगावसं वाटतं, की त्यानं आयुष्याचा Ramp करुन घेऊ नये.

**ऑंकार वर्वे**

मुलुंड वाणिज्य महाविद्यालय

कनिष्ठ गट

•••

# प्रदर्शन भरविण्याचा एक वेगळा अनुभव

*राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताह निमित्ताने भरविण्यात आलेला प्रकल्प संदर्भ ग्रंथप्रदर्शनाबद्दलचा अनुभव. -संपादक*

राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताह हा दि. १४ ते २० नोव्हेंबर या कालवधीत साजरा करण्यात येतो. त्या निमित्तानेच कळवे येथील जवाहर वाचनालयात ग्रंथालय सेवा समूह ठाणे या संघटनेच्या विद्यार्थ्यांनी एक प्रदर्शन आयोजित केले होते. दि. २० व २१ असे दोन दिवस हे प्रदर्शन भरविण्यात आले होते. ह्या प्रदर्शनात ग्रंथालय शास्रातील पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे प्रकल्प आणि वाचनालयातील दुर्मिळ असे संदर्भ ग्रंथ होते.

हे प्रदर्शन भरविण्यामागे असलेला उद्देश म्हणजे कपाटात बंदिस्त असणारे विद्यार्थ्यांनी बनविलेले प्रकल्प हे लोकांच्या नजरेस आणणे, तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठा बद्दल लोकांना माहिती करून देणे. आणि राष्ट्रीय ग्रंथालय सप्ताह निमित्त सार्वजनिक ग्रंथालयाला एक चांगला उपक्रम उपलब्ध करून देणे हा होता. सार्वजनिक ग्रंथालया बद्दलची वाढत चाललेली उदासीनता दूर करण्याचा हा छोटासा प्रयत्न !

ह्या प्रदर्शनात प्रदर्शित केले गेलेले महाविद्यालयातील ग्रंथालय शास्राच्या गेल्या दोन वर्षातील पदवी प्राप्त विद्यार्थ्यांचे निवडक प्रकल्प होते तसेच कळव्यातील जवाहर वाचनालयातील संदर्भ ग्रंथ होते. त्यामुळे लोकांना दुर्मिळ अशा संदर्भ ग्रंथांची ओळख झाली. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना प्रकल्पाविषयी माहिती मिळाली. आणि त्यातूनच वांदोडकर महाविद्यालय आणि जवाहर वाचनालय यांच्यात ग्रंथालय सहकार निर्माण करण्याची शक्यता या उपक्रमामुळे झाली.

प्रत्यक्षात ग्रंथ प्रदर्शन भरविण्यासाठी ग्रंथालय सेवा समूहाच्या विद्यार्थ्यांनी अनेक प्रकारची कामे योजना बध्द रित्या केली. तारखा ठरविणे, जवाहर वाचनालयातील जागा निश्चित करणे, त्याच बरोबर प्रदर्शनाचा विषय असलेले प्रकल्प. त्या सर्व प्रकल्पातील निवडक आणि महत्वाचे प्रकल्प जवाहर वाचनालयातून नेणे. प्रकल्पांबरोबरच जवाहर वाचनालयातील महत्त्वाचे निवडक संदर्भ ग्रंथ काढणे. ते प्रदर्शित करणे. त्याच प्रमाणे आयोजन आणि निवड मांडणी झाली तरी शेवटचे काम असते ते म्हणजे आपण आयोजित केलेल्या कार्यक्रमांची प्रसिध्दी करणे हे ही तितकेच महत्त्वाचे असते. ह्यामुळे आपल्या कार्यक्रम कुठे व केव्हा आहे यांची नागरिकांना माहिती मिळते आणि आलेल्या संधीचा सर्वांना फायदा घेता येतो. आम्ही भरविलेल्या प्रदर्शनामुळे कळव्यातील नागरिकांना छोटे खानी पण चांगले प्रदर्शन पहावयास मिळाले.

या प्रदर्शनास लोकांनी दिलेला प्रतिसाद अतिशय उत्तम होता आणि त्यांना प्रदर्शन आवडल्यांची पोच पावती ही त्यांनी व्यक्त केलेले अभिप्राय हे देत होते. एकंदरीत प्रदर्शनात सर्व नागरिक तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी यांची संख्या जास्त होती.

त्यांचे अभिप्राय वाचल्यानंतर असे लक्षात आले की, ग्रंथालय शास्राविषयी लोकांत अज्ञान आहे, आणि ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ म्हणजे काय ? ते त्यांना ह्या प्रदर्शनातून कळले. तसेच काहींनी तर हे प्रदर्शन अजून आठ दिवस तरी हवे होते अशी सुध्दा मागणी केली. आणि या प्रदर्शनातून आम्हांला खूप काही शिकायला बघायला मिळाले असे ही लिहिले.

यातूनच आम्हांला (म्हणजेच ग्रंथालय सेवा समूह) खूप काही शिकायला मिळाले. ते म्हणजे थोडक्या कष्टातून व थोड्या खर्चात एक चांगला उपक्रम कसा राबवावा त्यासाठी कोणती-कोणती कामे करावी लागतात

याचा अनुभव आला. ह्यात आमंत्रणाचा सुध्दा भाग येतो, कोणाला कशी आमंत्रण करायची असे एक ना अनेक प्रश्न सुरुवातीला आम्हाला पडले. पण जशी कामाला सुरुवात केली तसे ते प्रश्न सुटत गेले. यात मुख्य भाग म्हणजे सजावटीचा असतो. कारण आपण काही नवीन केले तरी ते लोकांपुढे मांडताना अधिक चांगल्या प्रकारे कसे करता येईल याकडे आपला कल जास्त असतो. तेव्हा सनईचे मंजूळ स्वर आणि शोभिवंत अशी रांगोळी हे विशेष आकर्षण हवेच. यातूनच लोकांचे लक्ष वेधून घेण्याचा केलेला हा छोटासा प्रयत्न. त्याप्रमाणे प्रसिध्दी या माध्यमांचा देखील आम्हांला उपयोग करावा लागला. त्यासाठी आम्ही बरेच प्रयत्न केले ते म्हणजे नागरिकांसाठी सूचना फलक लिहिणे जेणे करून त्यांना कार्यक्रमांची वेळ व दिनांक, विषय हे समजतील. त्याच प्रमाणे आपल्या कार्यक्रमाचे वेळी काढलेली छायाचित्र, वर्तमान पत्रात बातमी कार्यक्रमांविषयी लेख अशी एक ना अनेक प्रकारची कामे करावी लागली यातूनच नवी शिकण्याची संधी उपलब्ध झाली. जवाहर वाचनालयातील कार्यकर्ते कर्मचाऱ्यांनी खुप मदत केली. आणि तेथील कार्यकर्त्यांनी आमच्या प्रदर्शना बद्दल व्यक्त केलेली मते ही आम्हांला भविष्यात शिदोरी प्रमाणे उपयोगात येतील.

वर्गातील शिक्षणाबरोबरच आपल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रंथालयातील अनुभव देण्यासाठी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील केंद्रसंयोजक पाठक सर ही या सर्वा मागची प्रेरणा होती. तसेच माझे सहकारी सुनील पवार, पल्लवी तडस, श्री. सुधाकर फडके आणि मंदार काळे या सर्वांचा यातील सहकार्यांचा वाटा मोठा आहे.

**दीपाली सुरते**

माजी विद्यार्थिनी, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

ग्रंथालय शास्त्र विभाग

•••

# वाचक प्रतिसाद

'शीर्षकामध्ये वाचक खेचण्याचे सामर्थ्य हवे' हे माझे विधान दिशा (डिसेंबर २००१) वाचल्यावर एक वाचकाने विचारले की हे साधण्यासाठी काय करावे ?

मी : प्रथमत: लेखाचा भावार्थ नीट समजून घेतला पाहिजे व तो प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी संस्कृत सुभाषिते, अभंगांची शीर्षके, काव्याची जाण ह्याचा परिचय असावा लागतो. त्यासाठी चांगले वाचन व पाठांतर असावे लागते.

प्रश्न : आणखी एकादी अभ्यास करण्याची पध्दत सांगू शकाल का ? तायडतोब मी कसा अभ्यास करू ? शॉर्ट कट् (जलद मार्ग) आहे का ?

मी : जलद मार्ग म्हणून नाही सांगत. पण एक सोपा छंद, जीवन दृष्टी सांगतो. विश्वास मेहेंदळे यांनी लोकमान्य टिळकांच्या अग्रलेखांचा व वाड्मयाचा अभ्यास करून डॉक्टरेट संपादन केली आहे. त्यात त्यांनी लोकमान्य टिळकांच्या अग्रलेखांच्या शीर्षकांचा अभ्यास केला आहे. असे करता येते. आता माझ्या लक्षात असलेली टिळकांची टोकदार शीर्षके सांगतो. रँग्लर परांजपे यांच्या मतप्रणालीवर टीका करताना टिळकांच्या अग्रलेखाचे शीर्षक होते - प्रसाद शिखरस्तोपि काको न गरुडायते. (राजवाड्यावर कावळा बसला म्हणून त्याला कोणी गरुड समजत नाही.) तुरुंगातून सुटून आल्यावर टिळकांनी लिहिलेला अग्रलेख 'पुनश्च हरि: ओम' तेव्हा टिळक, आगकर यांच्या अग्रलेखांची शीर्षके वाचावीत-पाठ करावीत. महात्मा फुले, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे लेखांची शीर्षके पहा. म.हा. चे गोविंद तळवलकर यांचे अग्रलेख पहा. शांता शेळके सांगतात ना तसे शब्दांवर प्रेम करावे. शब्दांसाठी वेडे व्हावे. यांचे अग्रलेख पहावेत. नाटककार गडकरी, पु. ल. देशपांडे, बा. भ. बोरकर. नुसते शब्दही ज्ञानेश्वरांसारखे शब्दभंडार वाढवावे. असे शब्द-प्रेम, शब्द-वेड, शब्द-छंद लावून घ्यावा.

जाहिरात कला ही अशीच शब्द-शीर्षकांची आतषबाजी आहे. शब्दांची चव घ्यायला शिका.

वाचक : सर, मला नवीनच दृष्टी दिलीत. छंद दिलात आभार मानायलाही शब्द नाही. म्हणून नमस्कार...

ह. श्री. परांजपे, ठाणे.

# इंधन वाचवण्यासाठी : भाग १

*पी. ई. एस. टी. मध्ये अनेक वर्षे चालक व चालक प्रशिक्षण केलेले श्री. आप्पासाहेब तथा वि. ना. कोपरकर यांचे हे इंधन वाचविण्यासाठी प्रशिक्षण वर्गास केलेले भाषण आहे. महाराष्ट्र शासनातर्फे त्यांना चालकांना प्रशिक्षण देण्यासाठी देशभर पाठविले जाते. अतिशय अनुभव समृध्द असणारे आप्पासाहेब त्यांच्या अनुभवांवर आधारित बोलतात. अगदी साधी भाषा हा त्यांच विशेष.*

*कॅसेटवरून लिहून काढण्याचे काम बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालय शास्त्राच्या सौ. अलका चव्हाण यांनी आत्मीयतेने केले आहे. दिशा च्या वाचकांना एक वेगळा विषय वाचायला मिळावा म्हणून हे भाषण देत आहे.*

*- संपादक*

इंधन वाचविण्याची आवश्यकता का निर्माण झाली, यासंबंधातले काही विचार मी आपणापुढे घेऊन आलोय. आपल्या सर्वांना माहिती आहे की आपण रोज ज्या गाडीवर काम करतो त्या ठिकाणी रोज आपल्याला टाकी भरून मिळते. बाहेरच्या पेट्रोलपंपावरती डिझेल किंवा पेट्रोल भरण्याकरिता रांगा लागलेल्या असतात. ही अशी सगळी परिस्थिती असताना हे इंधन वाचवा, पेट्रोल वाचवा, डिझेल वाचवा हे सांगायची पाळी का यावी ? तर मागे वळून बघितलं तर आपल्या लक्षात येईल की पूर्वीपासून या देशामध्ये आसाम आणि गुजरात या दोन प्रांतातून ३०% क्रुडतेल आपल्याला मिळत असे. या ३० % नी आपली गरज भागत नाही. म्हणून जवळ जवळ ७०% तेल मध्यपूर्वेतील आखाती प्रदेश आहेत त्या आखाती प्रदेशातून आपण आयात करतो.

दिनप्रतिदिन वाहनांची संख्या वाढत चालली आहे. होणारी आयात सुध्दा वाढत चालली आहे. बाजारात तेलाच्या किंमती वाढत आहेत आणि या भाववाढीचा परिणाम देशाच्या अर्थनीतीवर पण होतो आणि तुमच्या आमच्यासारखी जी सामान्य माणसं आहेत त्यांच्या खिशावर पडत असतो. बाजारातल्या वस्तुंचे भाव वाढले की आपल्या खिशातून जास्त पैसे द्यावे लागतात. ही परिस्थिती कुठेतरी बदलायला पाहिजे आणि त्यादृष्टीने प्रयत्न सुरु झाले. जे तेल आपल्याला खाणीतून मिळतं ते कच्चं, क्रुडतेल मिळतं. त्याचा उपयोग आपण करू शकत नाही. म्हणून आपण ते रिफायनरीत पाठवतो. आणि त्यापासून पेट्रोल, डिझेल, घासलेट, डांबर, गॅस असे अनेक बाय प्रॉडक्टस् बाहेर पडतात. आणि त्याचा उपयोग आपण करत असतो. तज्ज्ञलोकांनी एकदा जमिनीखालच्या तेलाची पाहणी केली आणि पाहणी केल्यानंतर त्यांच्या लक्षात असं आलं की या जमिनीखालीच तेल जे आहे ते आपल्याला सदा सर्वकाळ पुरणार नाही. एक दिवस संपणार आहे. आणि तो दिवस सुध्दा लांब नाही आहे.

आगामी वीस-पंचवीस वर्षांच्या काळानंतर या जमिनीखालून आपल्याला एक तेलाचा थेंबसुध्दा मिळणार नाही. आणि एक फार मोठी आपत्ती संबंध जगावर येणार आहे. म्हणजे काय होणार ? तर मिल, फॅक्टरी बंद होतील. विमानसेवा, रेल्वेसेवा बंद होईल. आपल्या गाड्या ठप्प होतील. घरातला गॅस, विज जळणार नाही. अशी स्थिती आगामी वीस पंचवीस वर्षांच्या काळानंतर येणार आहे. ही येऊ नये म्हणून आज संबंध जगभर इंधन वाचवण्याचे प्रयत्न चालू आहेत. केवळ हिंदुस्तान नाही, तर जगाच्या पाठीवर कोठेही आपण गेलो तर त्या ठिकाणी सुध्दा असा प्रकारचे प्रयत्न चालू आहेत. अणि म्हणून या देशात १९७६ साली भारत सरकारने पी. सी. आर. ए. म्हणजे 'पेट्रोलियम कॉन्झर्वेशन रिसर्च असोसिएशन' नावाची एक समिती तयार केली. १९७६ ते ७८ या दोन वर्षामध्ये समितीने

संबंध भारत देशात भ्रमण केलं आणि अभ्यास केला. आणि मग मार्गदर्शनाला सुरुवात केली. आपल्याकडे तेल पुरवणारे बरेच विभाग आहेत. पण त्यातला त्यात हा ट्रान्सपोर्ट विभाग जास्त प्रमाणात तेल खर्च करतो. तिथल्या चालकांना आणि जो मेकॅनिक स्टाफ आहे या दोघांनाही प्रशिक्षित करणारे आणि तेव्हा ट्रान्सपोर्ट विभागात तेल कसं वाचवता येईल या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. कदाचित आपली कल्पना असेल की फक्त ड्रायव्हरना ट्रेनिंग दिले जाते. मेकॅनिक स्टाफला सुध्दा आम्ही ट्रेनिंग देतो.

मध्यंतरी मी भोसरीला ए. डब्लू. एफ. फोरमन आणि हेड मेकॅनिक यांचा क्लास घेतलेला होता आणि ड्रायव्हरच्या ताब्यात गाडी देण्यापूर्वी काय काय गोष्टी बघणं आवश्यक आहे याची कल्पना त्यांना दिलेली होती. अशा प्रकारचे प्रशिक्षण त्यांना पण देण्यात येते. या करता आम्ही टाटांचे इंजिनियर, लेलँडचे इंजिनियर, बॅटरीवाले, टायरवाले या सगळ्यांना बोलावलेले होते. आणि असा तीन दिवसांचा क्लास आम्ही त्यांचाही घेतलेला होता. तेव्हा आपल्या मनात शंका असते की केवळ चालकांना शिक्षण दिले जाते. बाकीच्यांना दिले जात नाही, असं नाही तर बाकीच्यांनाही देण्याची व्यवस्था आमच्याकडे आहे.

या ट्रान्सपोर्ट विभागात जर आपल्याला तेल वाचवायच असेल तर फक्त दोन घटक काम करतात. त्यातला पहिला घटक म्हणजे चालक आणि दुसरा घटक म्हणजे मेकॅनिक स्टाफ या दोघांच्या सहकार्याने तेल वाचू शकतं. अन्य कोणीही वाचवू शकत नाही. चालकांनी आपल्या आपल्या ज्या चालवायच्या वाईट सवयी आहेत त्या सोडायच्या आहेत. आणि चांगल्या सवयींनी गाडी चालवायची आहे. आणि मॅकनिक स्टाफने मशिनरीची देखभाल चांगल्या प्रकारे करायची आहे. या जर दोन गोष्टी एकत्र आल्या तर डिझेल, पेट्रोल वाचू शकतं. अपघाताच प्रमाण ही कमी होऊ शकतं. असा अनुभव ठिकठिकाणी येतो.

हे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आहे, त्याचबरोबर आपल्याला कुठे आणखीन तेल मिळेल का ? याचा शोध घेण्याचा प्रयत्न सुध्दा चालू आहे. आपण जर पेपर वाचत असाल किंवा टीव्ही बघत असाल तर मध्यंतरी आपण बघितलं होत की मुंबईपासून ५० कि. मी. अंतरावरती भर समुद्रामध्ये आपल्याला एक तेलाची विहीर मिळालेली आहे. आणि त्या विहीरीमधून तेलाचे उत्पादन सुरू आहे. आताच काही दिवसांपूर्वी त्याच्याशेजारीसुध्दा आणखीन खोदकाम करत आणखीन तेल मिळवण्याचे प्रयत्न चालू आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये श्रीवर्धन नावाचे गाव आहे. त्याठिकाणी सुध्दा एक निलम क्षेत्र निर्माण झालेले आहे. त्याठिकाणीसुध्दा तेल मिळण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. पुढे रत्नागिरी, नाशिकजवळ गंगापूर डॅम आहे, त्याच्या आजूबाजूस तेल मिळण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. परंतु तेल सापडलं याचा अर्थ ते लगेच बाजारात येऊ शकत नाही कारण साठा किती आहे याचा प्रथम अंदाज घ्यायला लागतो नाहीतर मिळणारं तेल कमी आणि माणसे आणि मशिनरीचा खर्च जास्त, असं जर व्यस्त प्रमाण झालं तर ते कठिण. आपल्याला परवडणार नाही. तेलाचा शोध - प्रशिक्षणाचं काम चालू आहे तसे तेलाचा शोध घेण्याचे काम सुध्दा चालू आहे. त्याचबरोबर आणखी एक भाग आहे की ह्याला पर्यायी व्यवस्था काही आहे का , याचाही विचार आज जगभर चालू आहे. समजा उद्या तेल संपलं तर ? गाड्या आपण कशावर चालवणार आहोत. या करता निरनिराळे प्रयोग निरनिराळ्या ठिकाणी चालू आहेत.

असा एक प्रयोग इंग्लड मध्ये झाला. त्यांनी एक छोटी गाडी घेतली. या गाडीला डिझेल आणि पेट्रोल लागत नाही तर ती बॅटरीवर चालते. पण ही गाडी अजून लहान प्रमाणात आहे. आपली गरज काय आहे ? तर ८० ते १०० पॅसेंजर वाहून नेणारी बस किंवा दहा ते बारा टन माल वाहून नेणारा ट्रक एवढी आपली गरज आहे. तर अशी

गाडी निर्माण करायची असेल तर किती बॅटऱ्या लागतील ? इंजिनमध्ये काही फेरफार करायला लागेल का ? याचा विचार चालू आहे. प्रयोग यशस्वी झालेला आहे. तोपर्यंत असणारा प्रत्येक थेंब अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा आहे तो वाचवा.

दुसरा प्रयोग इंग्लडने पुन्हा केला. आपल्याला माहिती आहे की आपल्याकडे रोज सूर्य उगवतो भरपूर प्रकाश देतो. पंखे लावून सुध्दा आपण घरात बसू शकत नाही. अशी स्थिती असते तर या सौरशक्तीच्या उपयोगाने आपल्याला गाडी चालवता येईल का ? असा प्रयोग इंग्लडमध्ये झाला. त्या गाडीला स्टार्टिंगपुरती बॅटरी आहे. बाकी ती सौर शक्तीवरती चालते. पण त्यात सुध्दा आणखी काही दोष आहेत आणि ते दोष काढण्याचा प्रयत्न झालेला आहे. आज सौरशक्तिवरती मोठ्या प्रमाणात प्रयत्न चालू आहेत. अनेक घराघरात व रस्त्यावरचे दिवे सुध्दा आज सौरशक्तीवर लावले जातात. सूर्यचूल बाजारात आलेली आहे. सूर्यहोडी चालू आहे, कॅलक्युलेटर्स चालू आहेत. अशाप्रकारे एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रयोग सुरू आहेत. यशस्वी झालेले आहेत. तोपर्यंत आपल्या हातात असणारा थेंब अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा आहे आणि तो आपल्याला वाचवायचाय.

दुसरी शक्ती अमेरिकेने विकसित केली. त्याला आपण अणुइंधन म्हणतो किंवा अणुर्जा म्हणतो. महाभयंकर शक्ती आहे. ती सामान्य ड्रायव्हरला गाडीमध्ये कशी वापरता येईल. त्याची तीव्रता कशी कमी करता येईल या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. आतापर्यंत मी आपल्याला तीन प्रयोग सांगितले. बॅटरीवर चालणारी गाडी, सौरशक्तीवर चालणारी गाडी आणि अणुइंधनवर चालणारी गाडी हे तीनही प्रयोग यशस्वी झालेले आहेत. बाजारात येण्याकरता काही काळ लागणार आहे. तोपर्यंत आपल्या सर्वांच्या हातामध्ये असणारा थेंब अत्यंत महत्त्वाचा आणि मोलाचा आहे आणि तो वापरायचा आहे.

आणखी एक चौथी शक्ती कार्यरत आहे. जेव्हा आपण जेवणाकरता गॅस वापरतो त्या गॅसवरती गाडी चालवता येते असा प्रयोग झाला. त्याचं उदाहरण म्हणून बी. ई. एस. टी. ने बारा डबलडेकर बस आज या गॅस सिलेंडर ने चालवलेल्या आहे. अनेक प्रायव्हेट कार आणि टॅक्सीज सुध्दा त्यावर चालवतात. तोही प्रयोग सुरू झालेला आहे, त्याचा कारभार सुरू झालेला आहे.

आणखी एक शक्तिसुध्दा उदयाला आलेली आहे. तिचा वापर फार मोठ्या प्रमाणात ब्राझील देशात केला जातो. जवळजवळ ८०% वाहने आणि मशिनरी ही त्याठिकाणी चालवली जाते. उसाच्या मळीपासून निघणारा जो एकमेव गॅस आहे. त्या इथनॉल गॅसवरती ही सगळी वाहने चालतात. आपल्या कडे सुध्दा महाराष्ट्रात एक केंद्र आहे आणि उत्तरप्रदेशात एक केंद्र आहे आणि आणखी अन्य ठिकाणी आहेत. अशा तीन क्षेत्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी उसाचे कारखाने आहेत अशा ठिकाणी इथनॉल गॅस निर्माण करायला सांगितला आहे. त्या शक्तीवर सुध्दा आपण गाडी चालवू शकतो. फार वर्षापूर्वी एस.टी. महामंडळात ज्यावेळेला पाटणकर जनरल मॅनेजर होते त्यावेळी त्यांनीसुध्दा एक प्रयोग केलेला होता. वनस्पतीच्या तेलापासून आपल्याला गाडी चालवता येईल का ? असा तो प्रयोग होता. परंतु पाटणकर साहेबांची बदली झाली दिल्लीला आणि तो प्रयोग तसाच राहिला.

दुसऱ्या महायुध्दात एस. टी. महामंडळाचा एक प्रयोग झालेला होता. जुने लोक असतील त्यांना माहीत असेल. पूर्वीच्या गाड्या कोळशावर आपण चालवत होतो. ज्याठिकाणी क्लीनर बसतो, त्या ठिकाणी कोळशाचा बंब होता. आणि वर टपावरती कोळशाची पोती ठेवलेली असायची. इतक्या पर्यायी व्यवस्था आज ट्रान्सपोर्ट विभागाला उपलब्ध झालेल्या आहेत. पण या सर्व बाजारात

येण्याकरता काही काळ लागणार आहे.

मी प्रत्येक चालकाला सांगतो की फक्त एकच थेंब वाचवा. काय कठिण आहे का हो ? एक थेंब एका दिवसात. या हिंदुस्थानात लाखो ड्रायव्हर काम करतात, एवढे थेंब रोज वाचणार आहेत. आपल्या मराठीमध्ये म्हण आहे, " थेंबे थेंबे तळे साचे " या नियमाने सुध्दा आपण फार मोठ्या प्रमाणात तेलाची बचत करू शकतो. पण हे केव्हा होणार ? ज्यावेळी तुमच्या मनात असा भाव पैदा होईल ही माझी गाडी आहे. ही माझी संस्था आहे, तरच. जर मी एस. टी. महामंडळाची गाडी चालवतो, आठ तास ड्युटी केली पगार मिळाला, एवढाच जर विचार असेल तर ते कधीही होणार नाही. जोपर्यंत या गाडीवरती काम करतो तोपर्यंत ती माझी गाडी आहे. मी उतरल्यानंतर ती एस.टी महामंडळाची होईल. एकदा माझी गाडी किंवा माझी वस्तू असं म्हटल्यानंतर त्याच्याबद्दल प्रेम निर्माण होत. आणि त्याच नुकसान कमीत कमी कसे होईल हे आपण बघतो. आणि त्याच्याकरता असा भाव निर्माण झाला पाहिजे की ही माझी गाडी आहे. ही माझी संस्था आहे. ही संस्था जर कायम स्वरुपात चालली तर माझी नोकरी मुलाबाळांचे उदरपोषण होणार आहे. हा भाव मनामध्ये पक्का होणे अत्यंत आवश्यक आहे. आज तशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आणि म्हणून आपल्या सर्वांचे सहकार्य असावे म्हणून मी या ठिकाणी उपस्थित झालेलो आहे. आपल्या साधुसंतांनी म्हटलेले आहे. "एकमेका साहाय्य करु अवघे धरु सुपंथ " फक्त ते वचन म्हणून राहिलेल आहे त्याचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग होत नाही.

एकमेकांचे एकमेकांशी सहकार्य असेल तर ही गोष्ट होऊ शकते. सहकार्य नसेल तर काय होऊ शकतं, त्याकरता एक छोटीशी गोष्ट सांगणार आहे. जुन्या जमान्यातील कहाणी आहे. एक राजा होता. या राजाचा राज्यकारभार फार चांगल्याप्रकारे चालला होता. राजा प्रजेवरती प्रेम करत होता, प्रजा राजावरती प्रेम करत होती. अत्यंत सुखासमाधानाने सर्व कारभार चाललेला होता. परंतु एक वर्ष अस उजाडल की पावसाळ्याचे दिवस आलेले आहेत. आकाशात काळे ढग जमा होतायत. आणि वाऱ्याबरोबर निघून जातायेत. पाऊस पडण्याचं चिन्ह नाही. पावसाळ्याचे एक, दोन, तीन महिने संपलेले आहेत. शेवटचा महिना राहिलेला आहे. राजाच्या मनात एक चिंता निमार्ण झाली. की जर यावर्षी पाऊस पडला नाही तर काय होणार ? पिण्याच्या पाण्याचे वांधे होतील. यावर्षी जर पाऊस पडला नाही तर काय होणार ? शेतीमध्ये धान्य निमार्ण होणार नाही. आणि अन्न आणि पाणी यावाचून अनेक लोक तडफडून मरण्याची शक्यता आहे. आपल्या सर्वांच्या घरोघरचा अनुभव आहे की माणसावरती आपत्ती किंवा संकट आलं की त्याला देवाची आठवण होते. तोपर्यंत नाही.

देव, अल्ला, ईश्वर, येशू याची आपण आठवण करतो. नाहीतर आपली नोकरी, बायकामुलं, नाटक सिनेमा यामध्ये आपण बेभान झालेले असतो. पण एखादी आपत्ती आली की मग देवाची आठवण होते. कल्पना करा आपला एखादा मुलगा आजारी आहे. आपण त्याला आपल्या फॅमिली डॉक्टरकडे घेऊन जातो. त्या डॉक्टरने तपासल्यावर सांगतो की ह्या मुलाचा आजार जरा गंभीर आहे. एखाद्या चांगल्या हॉस्पिटलमध्ये त्या मुलाला ॲडमिट करतो. तिथले डॉक्टर त्या मुलाला वाचवायचे सर्वप्रकारचे प्रयत्न करत असतात. परंतु त्या घरात काय घडत हो ? तर त्या मुलाची आई किंवा घरात असणारी म्हातारी आजी एका देवापुढे बसते. प्रार्थना करते की माझ्या नातवाला किंवा मुलाला बरे वाटू दे एखादी पूजा बांधीन.

राजा जरी राजा असला तरी मनुष्य होता. त्याने बघितलं दुष्काळाचं भीषण संकट राष्ट्रावरती येतंय. काहीतरी करणं आवश्यक आहे. त्याच्या मनामध्ये एक विचार आला

आपल्या नगरामध्ये एक महादेवाचं जागृत देवस्थान आहे. तेव्हा या महादेवाची एक पूजा बांधू आणि दुधाचा अभिषेक करू. आणि सर्व मिळून भगवंताची प्रार्थना करू, की या वर्षी पाऊस पडू दे. आता राजाच्या मनात हा विचार आल्यानंतर त्याला अशक्य काय आहे हो ? त्याच्याजवळ सत्ता आहे, संपत्ती आहे, बाजारात जाऊन दूध आणू शकत होता, पूजा बांधू शकत होता. अभिषेक करू शकत होता.

परंतु राजाने मनामध्ये दुसरा विचार केला . की मी हे सर्व कशाकरता करतोय तर पाऊस पडण्याकरता. आणि पाऊस पडला तर जमा होणारं पाणी मी काय एकटा पिणार आहे ? सर्वजण त्याचा उपयोग करणार आहेत. पाऊस पडला, शेतीमध्ये धान्य निर्माण झालं, मी एकटा नाही खाणार तर ही अनेक तोंड खाणारी आहेत. तेव्हा या पूजेमध्ये सर्वांचे सहकार्य किंवा हातभार मिळाला पाहिजे. आणि म्हणून त्याने आपल्या नगरामध्ये एक दवंडी दिली आपण सर्व ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामधून आलेले आहात. आपल्याला दवंडी किंवा थाळी माहिती असेल. अशाप्रकारची दवंडी किंवा अनाऊसमेंट केली की "आम्ही महादेवाची पूजा करणार आहोत आणि एक दुधाचा अभिषेक पण करणार आहोत. या मंदिरा शेजारी दूध जमा करण्याकरता एक टाकी बांधून ठेवलेली आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरनं एक लोटाभर दूध आणायचं आहे त्या हौदात आणून जमा करायच आहे.'' अशी राजाज्ञा झाली. दूध जमा करण्याचा दिवस उजाडलेला आहे. प्रत्येक नागरिक आपल्या घरनं एक लोटाभर दूध घेऊन हौदापाशी येऊन लोटा रिकामा करतोय आणि आपल्या घरी परत जातोय. अशी स्थिती सुरू झालेली आहे. परंतु आपल्याला माहीत आहे की समाजात निरनिराळ्या आचार विचारांची भिन्न प्रकारची माणस राहात असतात. त्यातल्या एका माणसाने असा विचार केला की नगरात राहणारे सर्व लोक त्याठिकाणी जाऊन दूध जमा करणार आहेत. मग माझ्या सारख्या एखाद्या माणसाने एक लोटाभर पाणी नेऊन जमा केलं तर काय होईल ? त्याच्या मनात दुसरा विचार आला की हौदामध्ये एवढ दूध जमा होणार आहे, त्यामध्ये हा एक लोटा पाणी कुठ मिक्स होवून जाईल कुणाला पत्ताही लागणार नाही. त्याच्या मनामध्ये तिसरा विचार आला कि मी दूध किंवा पाणी जमा करायला गेलोच नाही तर ? आजूबाजूचे पडोसी, शेजारी सगळे लोक मला विचारतील, बाबा रे सगळे लोक आम्ही जाऊन आलो. तू का आत नाही ? तर जाण आवश्यक आहे. त्यान लोटाभर पाणी घेतलं आहे. आणि वरती झाकण ठेवलेले आहे. हौदापाशी आलेला आहे. राजाने हौदापाशी वॉचमन किंवा पहारेकरी ठेवलेला नव्हता कुणी दूध आणलय का, पाणी आणलंय बघायला, पण राजाची श्रध्दा होती की आजपर्यंत मी प्रजेवरती प्रेम केल प्रजा माझ्यावरती करते. येणारं संकट सर्वांवर आहे. तेव्हा मी सांगितलेली गोष्ट प्रत्येक माणूस करणार, म्हणून त्याठिकाणी पहारेकरी नव्हता. त्याच्या मनात असा विचार आला तसा पाण्याचा लोटा घेतलेला हौदापाशी ओतला आहे. लोटा रिकामा केला आणि आपल्या घरी परत गेलाय. सूर्य मावळला. दूध जमा करण्याचा दिवस संपला. दुसरा दिवस पूजेचा उजाडलेला आहे. राजाने आपल्या सेवकाला सांगितल की हौदाच झाकण जरा उघडा, सगळं दूध बाहेर काढा आपल्याला अभिषेक करायचा आहे. ज्यावेळी त्या सेवकाने हौदाचं झाकण उघडलं तेव्हा काय दिसलं हो ? संपूर्ण हौद पाण्याने भरलेला होता. कुठलाही दैवी चमत्कार नव्हता. कुठलाही जादूटोणा, मंत्रतंत्राचा प्रकार नव्हता. मग काय घडलं ?

एका माणसाने जो विचार केला तो अनेक माणसांनी केला. ह्यांनी मनामध्ये विचार केला. हे दूध जमा करणार मी पाणी जमा केलं तरी चालेल. त्यांनी पण तोच विचार केला, हे दूध जमा करणार, मी कशाला जमा करू? आणि म्हणून सर्वांनी दुधाच्या हौदामध्ये पाणी नेऊन जमा केल. आणि राजाची दुष्काळ निवारण्याची चांगली योजना होती. ती पाण्यात गेली. वाया गेली. भावार्थ -

माझ्या गोष्टीचा भावार्थ आपल्या सगळ्यांना कळला असेलच आपल्या ह्या ठाणे विभागात आठ डेपो आहेत. प्रत्येक डेपोतले चार-चार, तीन-तीन ड्रायव्हर या ठिकाणी आलेले आहेत. हे ट्रेनिंग पुरं झाल्यानंतर आपल्या घरी जाताना आपल्या मनाशी असा विचार केला की मी भिवंडी डेपोमधून आलेलो आहे. आमच्या भिवंडी डेपोमध्ये १०० ड्रायव्हर काम करतात. आम्हाला तिघा-चौघांना ट्रेनिंग मिळालेलं आहे. आम्ही चार जणांनी नाही पेट्रोल वाचवलं तरी चालेल, उरलेले वाचवतील असा जर विचार करून घरी गेलात जसं हौदात पाणी जमा झालं तशी त्या त्या डेपोची स्थिती निर्माण होईल.

ही राष्ट्राने दिलेली हाक आहे. पुढे येणारे संकट येऊ नये म्हणून आतापासून जे प्रयत्न चालू आहेत. त्यामध्ये माझासुध्दा थोडासा हिस्सा कसा राहील याचा विचार करून घरी जाणं आवश्यक आहे. आपण टी. व्ही. वर रामायणात बघितल असेल की प्रभूरामचंद्र सेतु बांधत होते. आणि पलिकडे रावणाच्या लंकेत जाणार होते. सेतु बांधण्याचं काम चालू असताना अनेक माकडं, अनेक लोकं कुठे दगड टाकताहेत. कुठे झाड टाकताहेत अशाप्रकारे सेतु बांधण्याचं काम चालू होत. त्यामध्ये एक खार होती. त्या खारीच्या मनात सुध्दा असा विचार आला की एवढं चांगल काम चाललय आपण सुध्दा काही मदत करावी, आणि म्हणून ती वाळूत लोळत असे आणि पाठीवर जमलेली वाळू तिथे नेऊन टाकत असे. असा आपला खारीचा वाटा आहे. आणि म्हणून मी सांगितल की प्रत्येकाने एक थेंब जरी वाचवण्याचा प्रयत्न केला तरी सुध्दा आज ठिकठिकाणी चांगले अनुभव येताहेत, तेल वाचण्यासंबंधाचे, या ठाणे विभागातसुध्दा येतील. कालच तुमच्या साहेबांकडून कळलं की संबंध महाराष्ट्रामध्ये ठाणे जिल्ह्याचा चौथा नंबर आलेला आहे, तेल वापरण्यामध्ये. तर तो दुसरा किंवहुना पहिला कसा होईल. या दृष्टीने आपण प्रयत्न करायचे, आणि हे सगळं तुमच्या हातात आहे. आज आपण बघितलं की या तेल वाचविण्याच्याबाबतीत गुजरात आणि आंध्र या दोघा राज्यांमध्ये जोरात स्पर्धा सुरू आहे. कधी आंध्र एक नंबरला असतो, तर कधी गुजरात एक नंबरला असतो. महाराष्ट्राचा पहिला नंबर का नाही येणार ? जे विचार ऐकलेत ते केवळ आपल्यापाशी ठेवायचे नाहीत तर आपल्या डेपोमध्ये गेल्यानंतर आपले जे भाऊबंद आहेत त्यांना पण त्यांच्या भाषेत सांगता येईल तेवढं सांगायचा प्रयत्न करावयाचा, तरच ह्या गोष्टी होऊ शकतात. आपणा सर्वांचं सहकार्य मिळेल अशी अपेक्षा करतो. आणि इंधन वाचविण्याची आवश्यकता का निर्माण झाली हा विषय पुरा करतो.

ऑईल कुठे वाचेल.... गाडी एका जागी रात्रभर उभी राहिल्यामुळे पूर्ण इंजिन थंड झालेलं असतं. इंजिन ऑईल कुठे कमी होतं. खालच्या चेंबरमध्ये सगळं इंजिन ऑईल जमा झालेलं असतं वरचे पार्ट सुके होतात. सकाळी तुम्ही कामावरती येता आणि आल्यानंतर तुमचे अधिकारी तुम्हांला सांगतात की ही गाडी नाशिकला घेऊन जा, कोणाला ही गाडी मुरबाडला घेऊन जा. गाडीजवळ आल्यानंतर आपण त्या गाडीच्या दरवाजाला किंवा स्टेअरींगला नमस्कार करतो. आणि गाडीच्या सीटवर बसून लगेच इंजिन स्टार्ट करतो. आणि स्टार्ट झाल्यानंतर प्रेशर भरण्याकरता जोरजोराने रेज करण्याचा प्रयत्न करतो. ज्याला डिझेल किंवा पेट्रोल वाचवायचंय, त्यांनी ही गोष्ट करायची नाही. आणि म्हणून सांगितलं की थंड इंजिन स्टार्ट केल्यानंतर, स्टार्ट करताना क्लच दाबून करा. कारण जरी दांडा न्यूट्रलमध्ये असला तरी मागच्या ट्रान्समीटरचा संबंध सुटलेला नसतो. त्याचा लोड इंजिनावरती असतो. क्लच दाबल्यानंतर क्लच प्लेट मागे येते. आणि मागचा सगळा भार नाहीसा होतो. इंजिन फ्री होत. आणि लवकर स्टार्ट होतं. स्टार्ट झाल्यानंतर क्लचचा पाय उचला, खाली ठेवा आणि अंदाजाने एक ते दीड मिनिट थांबा. घड्याळ लावून बघण्याची आवश्यकता नाही. अंदाजाने कशाकरता, जे चेंबरमध्ये उतरलेलं आईल आहे हे वरच्या पट्टीत पोचायला

एक ते दिड मिनिट कालवधी पुरसा होतो. आणि तेवढा वेळ जर आपण दिला नाही. तर घर्षणामुळे आतल्या पार्टसची झीज होते. आणि एका जागी येकार इंजिन रेज केल्यामुळे तेलाचा खर्चही वाढतो.

तर सकाळी ज्यावेळेला आपण गाडी स्टार्ट करतो. त्यावेळी ही पध्दत वापरायला हवी. दिवसभरात करण्याची जरूरी नाही. आणि त्याच्यासमोर लिहायचं गियर बदलताना डबल डी क्लच केलाच पाहिजे. ज्यावेळी तुम्ही ट्रेनिंगस्कूलमध्ये भरती झालात त्यावेळी डबल डी क्लच करण्याची आवश्यकता काय आहे. आणि त्याप्रमाणे आपल्याकडून करून पण घेतलेलं आहे. परंतु लाईनवरती गेल्यानंतर आपण हे सगळे विसरतो. आणि निरनिराळ्या भागांनी क्लचचे ऑपरेशन सुरू करतो. डबल डी क्लच कसा करावा. हे आपल्याला शिकवलयं. हा सहा टप्प्यात करता येतो. पहिल्या टप्प्यामध्ये आपण क्लच दाबतो. दुसऱ्या टप्प्यामध्ये दांडा मोकळा करून घेतो. तिसऱ्या टप्प्यामध्ये क्लच सोडतो. चौथ्या टप्प्यामध्ये पुन्हा क्लच दाबतो. पाचव्या टप्प्यामध्ये गियर सरकवणे किंवा गियर टाकणे. याला स्लायडिंग म्हणतात. आणि सहाव्या टप्प्यामध्ये पुन्हा क्लच सोडतो. अस आपल्याला शिकवलेलं आहे. परंतु रस्त्यावर आज असं दिसतं की आम्ही क्लचला फक्त एकदाच पाय लावतो. फर्स्ट गियर टाकताना आणि बाकीच्या वेळेला दांडे मागे-पुढे खेचत असतो. धाड-धाड आवाज नुसता. मी चालकांना एक प्रश्न विचारणार आहे की स्वतःची गाडी असेल तर असं कराल का? तर त्याच उत्तर नाही आहे. किंवा एखादा आपल्या गाडीवरती ड्रायव्हर नोकरीला ठेवला आणि त्याने अशी गोष्ट केल्यानंतर त्याला आपण नोकरीवर ठेवणार आहोत का ? तर डबल डी क्लच केलाच पाहिजे. कुणावरती मेहरबानी करत नाही. गाडी चालवण्याचं ते प्रिन्सीपल आहे. जर क्लचची जरूरी नव्हती तर कुठल्याही मॅन्युफॅक्चर कंपनीने क्लच दिलाच नसता, त्याची आवश्यकता आहे म्हणून दिलेला आहे.

मला असं म्हणायचंय की मी ज्या कंपनीत नोकरी करतो त्या ठिकाणच्या असणाऱ्या गाड्या असत्या तर तुम्ही एकानेही नोकरी केली नसती. आमच्याकडे डॅमलर गाड्या होत्या, ऑलविन गाड्या होत्या. हा डॅमलर मार्गला स्टेअरिंग गियर होते. थोड्या मोठ्या गाडीला नेऊन ठेवायच आणि जोरात पाय मारायचा. तरच गियर एंगेज होत असे. नाहीतर होत नसे. आणि पाय मारताना जरा चुकला तर एवढं लांब पाइल्ड बाहेर पडत असे आणि रक्तबंबाळ होत असे. आणि पुन्हा ते पाइल्ड आतमध्ये घालविण्याकरिता ड्रायव्हर आणि कंडक्टर दोघेही उभे राहत असत. तेव्हा ते आतमध्ये जात असे. आईचे दूध आठवत असे. सायनपासून बॅलार्डपियर पर्यंत चव्वेचाळीस स्टॉप आहेत. जाताना चव्वेचाळीस गुणिले चार एवढ्या वेळेला, मग ते स्टॉप आणि सिग्नल सोडूनच द्या. आज तुमच्या नशिबाने टाटा आणि लेलंडसारख्या चांगल्या गाड्या तुम्हांला मिळाल्या आहेत. आमच्याकडे जी गाडी होती त्यात साठ पौंड हवा राहायची. एकदा, दोनदा ब्रेक मारला की हवा संपायची हॅन्डब्रेकवर गाडी रोखायला लागत असे. अशा काळबादेवी आणि गिरगावमध्ये आम्ही गाड्या चालवल्या आहेत. आमच्याकडे ऑलविन गाड्या होत्या. हॅन्डल मारायला लागत असे, हात मारताना बॅक झाला तर हात टोचत असे. आज तुम्हांला चांगल्या गाड्या मिळाल्या आहेत त्याचा दुरुपयोग आपण करतो आहोत. तेव्हा डबल डी क्लचला पर्याय नाही. तो केलाच पाहिजे. कदाचित थोडा हार्ड असेल आपल्या योग्य अधिकाऱ्याला दाखवून तो बरोबर करून घ्या आणि त्याची माहिती होण्याकरता महिन्यातला एक तास वर्कशॉपमध्ये जा. म्हणजे आपल्याला कोणी फसवत तर नाहीये ना याची नक्की कल्पना येईल. आपण सांगतो, जरा ब्रेक बरोबर नाहीये. मग फिटर खालती जातो. इकडे-तिकडे करतो पाना वाजवतो. गाडी ओ. के. की आम्ही गाडी घेऊन निघालो. (क्रमशः)

**श्री. वि. ना. कोपरकर**
कळवा, ठाणे.

# ''राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय, नागपूर''

*नागपूरातील राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबद्दल सर्वसामान्यांना विदर्भातील एका चांगल्या आणि समाजाचा विकास होण्याच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती व्हावी या हेतूने लिहिलेला एक छोटासा आढावा. - संपादक*

सार्वजनिक ग्रंथालयांच्या कक्षेत मोडणारे 'अ' दर्जाचे राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय संपूर्ण विदर्भात नव्हे तर महाराष्ट्रात सुध्दा सार्वजनिक ग्रंथालयांत लौकिक असलेले, समाजाच्या दृष्टीने जागृत असणारे, विविध कार्यक्रमांचे आयोजन करणारे, नागपूरचा केंद्रबिंदू असणाऱ्या सीताबर्डी मेनरोडवर असलेले १०५ वर्षांचे असलेले हे सार्वजनिक वाचनालय.

**राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयाची सुरुवात**

ब्रिटिश सत्ता भारतात दृढमूल झाल्यावर पोस्ट, रेल्वे याप्रमाणेच शिक्षण देखील इंग्रजांनी भारतात सुरू केले. शिक्षणाकडे मोठ्या प्रमाणावर लोक आकर्षित झाले. शाळा, महाविद्यालयांतून बाहेर पडलेल्या सुशिक्षितांची ज्ञानसाधनेची, वाचनाची भूक मोठ्या प्रमाणात वाढली. त्यामुळे वाचनालयाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासू लागली.

ब्रिटिश लोक स्थानिक लोकांना 'नेटिव्ह' म्हणायचे. बर्डीवरच्या लोकांनी एकत्र येऊन १८६६ मध्ये सीताबर्डी नेटीव्ह वाचनालय स्थापन केले.

नागपूर शहर भारताच्या नाभीस्थानी आहे. त्यावेळी ग्रेट इंडीयन पेनीन्सुला आणि बंगाल नागपूर रेल्वेचा नागपूरला संगम होत होता. त्यामुळे बंगाली, दक्षिणात्य, उत्तर प्रदेशचे लोक मोठ्या प्रमाणात राहत होते. या सर्व लोकांसाठी साहित्य ठेवणे आवश्यक होते. विशेषतः त्या-त्या भाषेतील पुस्तके ठेवणे महान कठीण काम होते. त्यावेळेस भोसल्यांच्या नागपूर शहराबाहेर बर्डी वस्ती होती. सिव्हील लाईन्समध्ये श्रीमंत लोकांची वस्ती होती. बर्डी ही वकील, अध्यापक, सरकारी अधिकारी, नोकरांची आणि विशेषतः स्वातंत्र्याने भारावून गेलेल्या गरीब आणि मध्यमवर्गियांची वस्ती होती. श्री हरी महादेव पंडीत, ग. का. गोखले, वासुदेवराव परांजपे, ना. वा. रानडे, रा. व. नारायण स्वामी नायडू, गोपाळराव भिडे आणि कृष्णराव फाटक ही मंडळी एकत्र येऊन काव्यशास्त्र, विनोद, प्रचलित घटनांवर आणि बदलत्या सामाजिक आणि स्वातंत्र्यासाठी त्याग करणाऱ्या कल्पनेने भारावली होती. त्यातूनच 'सीताबर्डी नेटीव्ह क्लब स्थापन' झाला.

नेटीव्ह क्लब मध्ये अध्यापक वर्ग आपल्या निबंधाचे वाचन करीत असत. त्यावर मग उपस्थित चर्चा करीत. पुढे-पुढे कविता वाचन आणि वृत्तपत्रांतील लेखांवर ही चर्चा होऊ लागल्या. वाचनालयाच्या दप्तरात ह्या सर्व गोष्टी वळणदार अक्षरांत नोंद करून ठेवल्या आहेत. सुरुवातीच्या काही नोंदी मोडी लिपीत आहेत. नंतर इंग्रजीत स्वातंत्र्योत्तर काळातील आजपर्यंतच्या सर्व नोंदी तपशीलवारपणे मराठी भाषेत आढळतात.

वास्तविक नागपूर शहरात मराठी भाषिकांचे बाहुल्य होते. परंतु जी आय पी आणि बी. एन. आर. रेल्वे यांचा संगम झाल्याने बंगाल, आंध्र येथील लोकांचाही तळ येथेच पडला. नागपूर ची मूळ वस्ती महाल, इतवारी, पण सीताबर्डी येथे नवी वस्ती वसू लागली. सिव्हील लाईन्स मध्ये उच्चशिक्षित बर्डी सारख्या नव्या वस्तीला आलेले

पुस्तक प्रिय आंध्रमधले नायडू, मुदलियार, राव, वर्हाडवरचे कोल्हटकर, भिडे, फाटक इ. लोकांमुळेच ह्या क्लबची स्थापना झाली. ह्याचा फायदा घेऊनच ही मंडळी आजच्या वाचनालयाच्या आवारांत एकत्र येऊन पुस्तक परीक्षण, निबंध वाचन करू लागले.

'नेटीव्ह क्लब' च्या बैठकी दर आठवड्याला नियमितपणे व्हायच्या आणि पूर्वीच नियोजन केल्याप्रमाणे भाषण वा निबंध वाचन व्हायचे. निबंधवाचनानंतर प्रश्नोत्तर होत. १८७६ च्या बैठकीचा अहवाल वाचल्यावर स्पष्ट कल्पना येते.

वाचनालय म्हणजे वर्गणी ही अपरिहार्यच. परंतु सीताबर्डी नेटीव्ह क्लब चे सदस्य स्वतःच वर्गणी देऊन नेटीव्ह क्लब चालवीत होते. इ. स. १८७६ च्या यादीत कोणाचेही नाव नाही. मात्र इ. स. १८७६ च्या च ह्या यादीत १२ रु., ६ रु., ३ रु., असे आकडे आहेत.

**आणि अशी झाली वाचनालयाची सुरुवात :**

वाचनालयाचे महत्त्वाचे कार्य म्हणजे पुस्तके आणि इतर वाचन साहित्य पुरविणे. १८६९ पासून काही त्यागी लोक मदत करून वाचनालय चालवीत होते. नवीन-नवीन पुस्तके वृत्तपत्रे वाचायची आवड असली तरी त्या काळात नेटीव्ह लायब्ररी ची आर्थिक परिस्थिती बेताचीच असावी.

नेटीव्ह लायब्ररीची नक्की जागा कोणती ? हा मुद्दा बराच काळ अनाकलनीय होता. ह्या लायब्ररीच्या संस्थापक सभासदांपैकी आणि १८६९ चे पहिले अध्यक्ष कै. रा. ब. सी. नारायणस्वामी नायडू हे मालगुजार होते. अन्य मालगुजार आणि सुशिक्षित मंडळींचा ह्यात समावेश होता. वर्गणी व देणग्या जमा करून ७०० रु. किमतीच्या दोन झोपड्या खरेदी करून वाचनालयाची इमारत उभी केली. टेंपल नावाच्या इंग्रज अधिकाऱ्याच्या नावाने येथे बाजार होता. त्याला टेंपल बाजार म्हणत. (१९६० पर्यंत या भागाला टेंपल बाजार नाव होते.) तेथे गोडाऊन्स होती. ही जागा वाचनालयाला देण्याचा प्रयत्न नामवत लोकांनी केला आणि नगरपालिकेने गोडाऊन्सची जागा तत्परतेने दिली. जागा तर मिळाली. पण इमारत कशी बांधणार? म्हणजे इमारत बांधकामासाठी निधी कुठून आणायचा ? त्यासाठी एक समिती निर्माण केली. नागपूर आणि अन्य शहरांतील दानशूर व्यक्तींना भेटून देणग्या मिळवणे निश्चित झाले. १८६९ पासून अस्तित्वात असलेल्या ''सीताबर्डी नेटीव्ह क्लब'' ह्या संस्थेचे एका सार्वजनिक वाचनालयात रुपांतर व्हावे म्हणून सध्याच्या सीताबर्डीस्थित संस्थेचे प्रमुख सदस्य श्री. राजाराम दीक्षित यांनी १०००/-रु. इमारत निधिला देणगी जाहीर केली. अशा रीतीने सीताबर्डी नेटीव्ह क्लब ''राजाराम दीक्षित वाचनालय'' झाले.

राजाराम पंतांप्रमाणे अन्यही दानशूर व्यक्तींनी देणग्या दिल्या. बांधकामाला पैसे कमी पडताच राजाराम पंतांनी आणखी ३,००० रु. दिले. आणि वाचनालयाची ५०'X२५'X१८' आकाराची इमारत डौलात उभी राहिली. शनिवार दि. १८-१०-१८९५ सकाळी ८ वाजता कमिश्नर फ्रेझर ह्यांच्या हस्ते नवीन इमारतीचे उद्‌घाटन झाले आणि राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयाची वाटचाल चालू झाली.

**राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयातर्फे चालविण्यात येणारे उपक्रम -**

प्रत्येक शहराची काही भूषणावह स्थाने असतात. नागपूर नगरीलाही अशी स्थाने लाभली आहेत. राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय त्यांपैकी एक. पूर्ण शतकाची परंपरा लाभलेले हे वाचनालय शहराच्या मध्यवर्ती विभागात वसलेले नागपूरातील एक सांस्कृतिक केंद्र आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रम -**

वाचकात ग्रंथविषयीचे प्रेम वाढविणे हा सार्वजनिक ग्रंथालयांचा उद्देश असल्याने लोक ग्रंथाकडे

आकर्षित होतील असे अनेक उपक्रम सार्वजनिक ग्रंथालये योजत असतात. वाचकांचे एक ग्रंथप्रेमी मंडळ स्थापन करून त्याच्या वतीने निरनिराळ्या पुस्तकांवर चर्चा घडवून आणणे, लेखक-वाचक भेटी यांसारख्या कार्यक्रमांतून लोकांना पुस्तकाविषयी माहिती देणे, काव्यवाचन, चांगल्या नाटकांचे नाटयवाचन इ. बरोबरच संगीत, चित्रकला, गृहविज्ञान, पाककला या विषयांकडे सुध्दा वाचकाचा कल करणे, प्रत्येक कार्यक्रमाला जोडून ग्रंथ प्रदर्शने आयोजित करणे, हे सगळे उपक्रम आयोजित करण्याचे काम सार्वजनिक ग्रंथालये करीत असतात.

**बालसंस्कार वर्ग -**

राजाराम वाचनालयाच्या अनेक उपक्रमांपैकी एक स्तुत्य उपक्रम म्हणजे बाल संस्कार वर्ग होय. या वर्गात ७ ते १४ वर्ष वयाच्या मुलांकरिता योगासने शिकवले जातात. त्याचा खरा उद्देश Sound Mind and Sound body या करिता आहे. लहान मुलांना थोरामोठ्यांशी कसे वागावे याशिवाय रामायण, महाभारतातील निवडक लोक गीते इ. पाठांतर करून घेऊन सुसंस्कार केले जातात. या संस्कार वर्गांमध्ये मुलांना कथाकथन स्पर्धा, वक्तृत्व, नाट्याभिनय इ. चे ज्ञान सुध्दा देण्यात येते. या वर्गांतून अनेक मुले वर आली आहेत. त्यांच्या कलागुणांना वाचनालयानेच वाव दिलेला आहे.

**जलसंवाद व्याख्यानमाला -**

नागपूर आणि विदर्भात तसेच जलस्तर कमी होत आहे. गेली कित्येक वर्षे झाली तरीही नागपूरची पाणीपुरवठ्याची समस्या काही दूर झालेली नाही. विदर्भाचा विकास होण्याच्या दृष्टीने जलस्त्रोतांचा उपयोग करून घेणे हे प्राथमिक कार्य आहे. तसे होत नाही, म्हणूनच वाचनालयाने पाणी आणि पर्यावरण यांच्याशी एक संबंधित अशी जलसंवाद व्याख्यानमाला चालू केली आहे. या व्याख्यानमालेसाठी येणारा खर्च हा स्वीस पाणी पारितोषिक विजेते डॉ. माधवराव चितळे यांनी दिलेल्या देणगीतून करण्यात येतो. वाचनालयाने दूरदृष्टी ठेवून भारत I W R S. I W W A and INDIAN INSTITUTIONS OF ENGINEEERS या तीन तांत्रिक विषयांशी संबंधित असलेल्या संस्थांना सुध्दा सहभागी करून घेतले आहे. अतिशय उच्च दर्जाची व्याख्यानमाला असा या व्याख्यानमालेचा लौकिक आहे.

**अखिल भारतीय पातळीवर स्पर्धा परीक्षा वर्ग -**

विदर्भातील विद्यार्थी हे अखिल भारतीय पातळीवरील स्पर्धांमध्ये फारसे यशस्वी होत नाही. यासाठी त्यांना मार्गदर्शनाची कमतरता पडते ही गोष्ट लक्षात घेऊन अखिल भारतीय पातळीवरील स्पर्धा परीक्षांना वर्ग वाचनालयाने सुरु केले आहे. या वर्गांना चांगलाच प्रतिसाद मिळतो असे आढळून आले. या परीक्षांमध्ये सेट, नेट, युपीएस, एमपीएसी, या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांनाही मार्गदर्शन केले जाते.

**वाचनालय नव्हे विद्यापीठ :**

कार्लाइल ने वाचनालय हे विद्यापीठ आहे असे म्हटले आहे. एवढी मोठी ग्रंथसंपदा मराठी, हिंदी, इंग्रजी. पण ही पुस्तकांची वखार काय कामाची ? हे ग्रंथ जरी नाही तरी त्यातलं ज्ञान लोकांपर्यंत पोहचविणे आवश्यक होते. राजाराम वाचनालय हे केवळ पुस्तकांची वखार राहू नये ते विद्यापीठ व्हावं, व त्याचा प्रत्यय लोकांना यावा, अत्तराचा सुगंध मिळविण्यासाठी हात नाकापर्यंत न्यावा लागतो त्याचप्रमाणे ज्ञान प्रसारासाठी पुस्तके वाचकांपर्यंत न्यावी लागतात, त्यासाठी निरनिराळे उपक्रम करावे लागतात व त्यानुसार हे वाचनालय विविध उपक्रम राबवीत आहे.

संस्कारक्षम पिढी घडविण्याच्या दृष्टीने नागपूरच्या हा संस्थेने प्रयत्न केला आहे. वाचनालयाचा मुख्य उद्देश लोकांना उत्तमोत्तम पुस्तके उपलब्ध करून देणे असाच असला तरीही या वाचनालयाने शैक्षणिक व सांस्कृतिक

क्षेत्रांत केलेली प्रगती लक्षणीय आहे हे वाचनालयामार्फत राबविण्यांत येणाऱ्या खालील उपक्रमांमधून निश्चितच ह्याची प्रचिती येते.

**ग्रीष्मकालीन अभ्यासवर्ग -**

वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. वि. वा. प्रभुदेसाईंना वाचनालयाने विद्यार्थ्यांसाठी काहीतरी करावे असे वाटत होते. शालांत परीक्षेतील विद्यार्थ्यांसाठी काहीतरी करावे असे वाटत होते. नागपूरची मुलं शालांत परिक्षेतील जीवघेण्या स्पर्धेत उतरण्यासाठी पुण्या-मुंबईला जातात. श्रीमंतांच्या मुलांना ह्या गोष्टी जमू शकतात. पण मध्यमवर्गीय लोकांना जमत नाही. तेव्हा अशा मुलांसाठी काहीतरी करावं ह्या हेतूने उपक्रम चालविण्याचे वाचनालयाने ठरविले. आणि योगायोगही असाच की, त्याच सुमारास भारताचे माजी पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांनी विदर्भातील मुलांसाठी अखील भारतीय स्पर्धा परीक्षांसाठी वाचनालयाने उपक्रम करावेत असे सुचविले होते. सुरुवातीला शालांत परीक्षेसाठी ग्रीष्मकालीन मार्गदर्शन वर्ग घ्यावे असे ठरवून तशी योजना तयार केली आणि काही कालावधीतच या वर्गांनी कमाल केली, यामुळे मध्यम वर्गीयांबरोबरच गरीब विद्यार्थ्यांची सुध्दा सोय झाली. केवळ नागपूरातून नव्हे तर विदर्भ, मराठवाडा व खानदेशातूनही या वर्गांना विद्यार्थी येऊ लागले.

पुस्तकी शिक्षण देणे हे वाचनालयाचे कार्य नसले तरी सध्याच्या शिक्षण क्षेत्रांतील चाललेली स्पर्धा पाहून हे वाचनालय १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी ग्रीष्मकालीन वर्ग एप्रिल-मे-जून महिन्यांत घेतले जातात. ह्या शिकवणी वर्गांची भरमसाठ फी साधारण परिस्थितील पालक देऊ शकत नाहीत. त्यांच्यासाठी वाचनालयाने अल्प फी घेऊन ही सोय केली आहे. शिवाय वाचनालय पी. एम. टी. चे वर्गही घेत असते. ह्या ग्रीष्मकालीन वर्गाशिवाय वाचनालय १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी वर्षभर घटक चाचण्या, सत्र परीक्षा व टेस्ट सीरीज घेत असते. वाचनालयाच्या या वर्गातून आजवर १६० विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले आहे. ह्या गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा व त्यांना शिकविणाऱ्या शिक्षकांचा सत्कारही दरवर्षी करण्यात येतो.

**असे ध्येय असे कार्यक्रम -**

माणसाचं मन सदैव भुकेलं असतं. त्याला ज्ञान हवं, मनोरंजन हवं, संगीत हवं, निरनिराळ्या कला हव्यात, हे जाणून वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन वाचनालयाच्या मार्फत करण्यात येते.

**१) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार -**

कै. प. पू. जनार्दन स्वामींच्या प्रेरणेने हा कार्यक्रम वाचनालयाने सुरू केला. आता तर ह्या सत्कार समारंभासाठी प्रायोजक सुध्दा लाभलेले आहेत. हा कार्यक्रम जवळजवळ २६ वर्षांपासून वाचनालयात सुरु आहे.

**२) आंतरशालेय राष्ट्रीय समुह गीत गायन स्पर्धा -**

'वंदे मातरम्' या गीताच्या शताब्दीच्या निमित्ताने १९७५ सालापासून चालू केलेली ही स्पर्धा खूप लोकप्रिय ठरली. गेल्या २५ वर्षांपासून अखंडपणे स्वातंत्र्यदिनी होणारा स्वातंत्र्यगीतांचा हा कार्यक्रम एकमेवाद्वितीय.

**३) हस्ताक्षर आणि चित्रकला स्पर्धा -**

मुलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी या स्पर्धा वाचनालयाने सुरू केल्या. गेली १५ वर्षे या स्पर्धांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. दोन्ही स्पर्धांमध्ये साहित्य आणि संस्कृतीचे जतन करण्याचा दृष्टिकोन आहे. विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधरावे, त्यांना परीक्षेत सुंदर हस्ताक्षरांमुळे अधिक गुण मिळावे, रामायण, महाभारत, बायबल सारख्या आणि सावरकर, कुसुमाग्रज यांचे ओजस्वी विचार मुलांपुढे जावे या उद्देशाने चालू केलेल्या स्पर्धा ग्रामीण क्षेत्रांतही लोकप्रिय ठरल्या आहेत. या शतकाचे साहित्यिक

कै. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचारधन लाखो विद्यार्थ्यांपुढे नेण्याचे कार्य सातत्याने गेली १५ वर्षे केवळ ह्या वाचनालयाने केले आहे.

४) लता मंगेशकर गीत गायन स्पर्धा

शाळेतून चित्रकला हद्दपार होऊ लागली म्हणून चित्रकला स्पर्धा चालू केली. शास्रोक्त संगीताकडे नवी पिढी आकर्षित होत नव्हती, पॉप, जाझ संगीत तरुण-तरुणींमध्ये लोकप्रिय होऊ लागलं. महाराष्ट्राची अस्मिता टिकविण्याचा प्रयत्न करण्याच्या हेतूने गान कोकिळा लता मंगेशकरांनी वयाची ६० वर्षे पूर्ण करताच राजाराम वाचनालयाने 'लता मंगेशकर गीत गायन स्पर्धा' चालू केली. ती अजूनही अखंडपणे चालू आहे. यामुळे अनेक तरुण गायक, वादक व संचलनकर्ते ह्यांना व्यासपीठ मिळाले.

५) बालसाहित्य संमेलन

एका संस्थेचा, एका व्यक्तीचा रौप्य महोत्सव असे ऐकण्यात येते. अशाप्रकारच्या कार्यक्रमाला आपण आनंदाने उपस्थित राहतो व आपल्याला त्या संस्थेची, त्या व्यक्तींची प्रगती इतक्या वर्षामधली लक्षात येते. पण एखाद्या बालसाहित्य संमेलनाचा रौप्य महोत्सव होईल हे आश्चर्यच!

बालकांमध्ये वाचनाची, लिखाणाची आवड निर्माण करण्यासाठी चालू केलेले प्रयत्न पूर्णपणे सफल झाले आहेत. या संमेलनातून लेखक, लेखिका, अभिनेते, अभिनेत्या, वक्तृत्व स्पर्धेचे फड जिंकणारे तरुण-तरुणी निर्माण झाले आहेत. मला वाटतं की, या वाचनालयासारखे सातत्याने दरवर्षी महाराष्ट्रांत कोठेही बाल साहित्य संमेलन घेतले जात नाही. हे संमेलन दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत घेतले जाते. संमेलनाची सुरुवात विद्यार्थ्यांचा सहभाग असलेली दिंडी काढून केली जाते. या दिंडीत निरनिराळ्या शाळांची असंख्य मुले भाग घेतात.

६) गणेशोत्सव

लोकमान्य टिळकांनी अभिप्रेत असलेली समाज प्रबोधनाची कल्पना पूर्णत्वाने वाचनालयाने अंगीकारलेली आहे. जी आजच्या काळात अभावानेच दिसते. या १० दिवसात नावाजलेल्या वक्त्यांची निरनिराळ्या विषयांवर भाषणे, परिसंवाद होतात. ह्यात नागपूरांतील आघाडीचे राजकारणी, समाजसेवक, संगीत, नाट्य, शिक्षण क्षेत्रातील नामवंत कुठलेही मानधन न घेता या गणेशोत्सवात आपली हजेरी लावतात. असा लोकमान्य टिळक प्रणित गणेशोत्सव दहाही दिवस अख्ख्या महाराष्ट्रात फक्त राजाराम वाचनालयातच होतो.

७) ग्रंथप्रदर्शने

नामवंत साहित्यिकांच्या जयंती, पुण्यतिथी, एकसष्टी, अमृत महोत्सव इ. निमित्ताने होणारी प्रदर्शने अभ्यासकांना आणि विशेषत: नवीन पिढीला वाचनासाठी उपयुक्त ठरतात. स्वामी, रथचक्र, महाश्वेता मालिका दूरदर्शवर सुरू झाल्या. तेव्हा तसेच रामायण, महाभारत या हिंदी मालिका चालू असतांना वाचनालयांतील कादंबऱ्यांना प्रचंड मागणी होऊ लागली. असेच अनुभव या वाचनालयाच्या ग्रंथ प्रदर्शनाच्या वेळी होतात. १७९९ ते १९१० या कालखंडातील दुर्मिळ पुस्तकांचे प्रदर्शन, गो. गं. जोशी प्रतिष्ठानच्या विद्यमाने जुन्या तांत्रिक ग्रंथांचे प्रदर्शन, क्रिकेट, टेनिस आणि ऑलिंपिक खेळांसंबंधी होणारी ग्रंथ प्रदर्शने क्रीडापटूंबरोबरच इतरांना सुध्दा मार्गदर्शक ठरतात. ह्यातील काही महत्त्वाची ग्रंथप्रदर्शने खालीलप्रमाणे -

अ) चित्रकार शि. द. फडणीस नागपूरांत आले असता त्यांच्या व्यंग चित्रांचे प्रदर्शन वाचनालयाने आयोजित केले होते. त्यांच्याजवळ नसलेली त्यांची व्यंगचित्रे पाहून ते सुध्दा आश्चर्यचकित झाले होते.

ब) दिवाळी अंकाचे प्रदर्शन हे वाचनालयाचे वैशिष्ट्य आहे. दरवर्षी निघणाऱ्या बहुतेक सर्व दिवाळी अंकांचे प्रदर्शन भरविले जाते. दिवाळी अंक महाग असल्यामुळे ते विकत न घेऊ शकणाऱ्या वाचकांची गरज या प्रकारे वाचनालय पूर्ण करीत असते.

पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान होताच त्यांच्या साहित्याचे आगळेवेगळे प्रदर्शन संपूर्ण भारतात राजाराम वाचनालयाने सर्वप्रथम आयोजित केले होते.

काही वेळा प्रकाशकांच्या मार्फत वाचनालयांत पुस्तक प्रदर्शने भरविली जातात. त्यात नावाजलेली व वाचनीय पुस्तके सवलतीच्या दरांत विक्रीस ठेवली जातात. ह्यात प्रामुख्याने मॅजेस्टिक, अक्षरधारा, हवळे ग्रंथजत्रा इ. प्रकाशकांचा उल्लेख करता येईल.

८) अभ्यासमंडळ

राजाराम वाचनालयांत एम. एम. एम.फिल., पी. एच. डी. च्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाच्या दृष्टीने खास सोय केलेली आहे. येथील विविध दुर्मिळ ग्रंथांखेरीज वृत्तपत्रे आणि नियतकालिके अभ्यासकांना उपयोगी पडतात. वाचनालयाने आता कै. कुसुमाग्रज, कै. पु. ल. देशपांडे इ. साहित्यिकांच्या वृत्तपत्रीय आणि नियतकालिकांमधील लेखांच्या फाईली तयार केल्या आहेत. त्या अभ्यासकांना फार मार्गदर्शक ठरतात. गेल्या काही वर्षात ग्रंथालयशास्त्राच्या पदवी परीक्षेकरिता वाचनालयांतील ग्रंथांचा (ग्रंथसूची तयार करण्यासाठी) विद्यार्थी मोठ्या प्रमाणांवर उपयोग करू लागले आहेत. चाकोरीबध्द विषय न घेता ग्रंथसूचीसाठी वेगवेगळे विषय विद्यार्थी घेतात.

९) फिरती बाल वाचनालये

वाचनालयात बाल तसेच महिलांसाठी वर्षभर कार्यक्रम चालू असतात. नागपूरात सरस्वती शिशु मंदिरात गेल्या सहा वर्षांपासून फिरते बाल वाचनालय चालू आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत काही दूरदूरच्या वस्त्यांमध्ये ही बाल वाचनालये चालतात. नुकत्याच भंडारा आणि पवनी या गावी फिरते बाल वाचनालय उपक्रमाअंतर्गत वाचनालयाचे कार्यकर्ते वाचनसाहित्याची आवड निर्माण होण्याच्या दृष्टीने विदर्भातील अनेक गावांमध्ये अशा प्रकारचा उपक्रम राबवितात.

१०.) विशेष दिन

लोकांना प्रेरणा मिळण्याच्या दृष्टीने वाचनालयांत थोर पुरुषांचे, श्रेष्ठ साहित्यिकांचे व नामवंत कलाकारांचे स्मृती दिन पाळण्यात येतात. मागील वर्षी 'साने गुरुजी जन्मशताब्दी' या निमित्ताने कथाकथनाचा कार्यक्रम घेण्यात आला. लोकांच्या मनात मराठी भाषेविषयी स्वाभिमान जागृत व्हावा या दृष्टीने १ मे ला 'मराठी दिन' साजरा केला जातो.

अशा अनेक सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे ही संस्था समाजांतर्गत ज्ञानाभिसरण निकोप राखण्यास तत्पर असते. यासाठी लोकरंजन व लोकप्रबोधन अशा व्यापक भूमिकेचे अधिष्ठान लाभलेले ज्ञानपीठ म्हणून या संस्थेचा उल्लेख करावा लागेल.

वरील उपक्रमांशिवाय वाचनालयात निरनिराळ्या प्रसंगांनुसार वेळोवेळी कार्यक्रम घेण्यात येतात. जसे, भाऊसाहेब माडखोलकर जन्मशताब्दी निमित्त आयोजित करण्यात आलेला परिसंवाद. या वाचनालयाला सर्वप्रकारच्या लोकांच्या भाषणांचा लाभ मिळाला आहे. ह्या सार्वजनिक वाचनालयाने लोकांवर, समाजावर चांगले संस्कार करण्याचा प्रयत्न केला आहे आणि पुढेही हे वाचनालय हे काम करतच राहील.

अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन १०० हून अधिक वर्षांचे 'सांस्कृतिक केंद्र' असलेलेम राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय. सार्वजनिक वाचनालयाने ज्या प्रकारे जास्तीत-जास्त प्रमाणांत वाचकांसाठी विविध

उपक्रमांचे आयोजन करायला हवे त्या प्रमाणांत उत्तमप्रकारे समाजशिक्षणाचे प्रबोधनात्मक कार्य राजाराम सीताराम दिक्षित वाचनालय करीत आहे.

**वाचनालयांतील विविध प्रकारचे वाचनसाहित्याचा साठा -**

सार्वजनिक वाचनालय म्हटले की त्यात विविध प्रकारचे, विविध विषयांवरील वाचनसाहित्याचा समावेश करण्यात येतो. अशाप्रकारच्या साहित्याचा समावेश राजाराम सीताराम दिक्षित वाचनालय, नागपूर येथे मोठ्या प्रमाणात आहे. आणि या वाचनालयात येणाऱ्या विविध वाचकांना आवश्यक असणाऱ्या माहितीचा उपयोग या साहित्यातून निश्चितच होऊ शकतो. अशा प्रकारचा वैविध्य माहितीपूर्ण वाचनसाहित्य साठा या वाचनालयांत आहे. यांत -

**१. ग्रंथ -**

वाचनालयात ग्रंथाचा प्रामुख्याने समावेश आहे. हे ग्रंथ मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत उपलब्ध आहेत. प्रामुख्याने मराठी भाषेतील साहित्याचा साठा मोठा आहे.

**२. नियतकालिके -**

वाचनालयात ग्रंथाच्या बरोबरीने नियतकालिकांना सुध्दा तितकेच महत्व देण्यात आले आहे. वाचकांना सध्याच्या काळांत आवश्यक असणारी माहिती तंत्रज्ञानाची माहिती देणारी नियतकालिके, सामान्यज्ञान विषयक नियतकालिके, गृहिणींकरिता, बालवाचकांकरिता खरेदी करण्यात येतात. याशिवाय नियतकालिकांकरिता वाचनालयात स्वतंत्र विभाग सुध्दा आहे.

**३. वर्तमानपत्रे -**

राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयांत निरनिराळ्या प्रकारची ८० च्या वर वर्तमानपत्रे येतात. याखेरीज नागपूरांतील सर्व वर्तमानपत्रांबरोबरच मुंबई, मद्रास, दिल्ली, कलकत्ता या ठिकाणांहून प्रसिध्द होणाऱ्या वृत्तपत्रांचा समावेश केलेला आहे. ही वर्तमानपत्रे हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषेतील असतात. व त्यांत वाचकांचा मोठ्या प्रमाणांत सहभाग असतो. या वर्तमानपत्रांचा सुध्दा स्वतंत्र विभाग वाचनालयांत आहे.

**राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयांतील वाचकांसाठी वाचनसाहित्य -**

सार्वजनिक ग्रंथालयाच्या कक्षेत येणाऱ्या या वाचनालयांत सुध्दा समाजांतील विभिन्न प्रकारचे वाचक त्यात स्त्री-पुरुष, विद्यार्थी, समाजसेवक, अभ्यासक, संशोधक, आचार्य पदवी प्राप्त करणारे विद्यार्थी, डॉक्टर, वकील, शिक्षक, व्यापारी इ. विविध प्रकारच्या वाचकांचा समावेश या वाचनालयांतील वाचकवर्गामध्ये होतो.

वाचनालयांतील वाचकवर्गास बहुसंख्य वाचकांना कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णने इ. वाचनसाहित्य वाचण्यासाठी आवडते. वाचनालयाची सभासदत्व फी अत्यंत अल्प असल्यामुळे गरीब लोकांना सुध्दा या वाचन साहित्याचा उपयोग करून घेता येतो. शालेय विद्यार्थ्यांना बालसाहित्याचा वापर करण्यासाठी या वाचनालयाचा स्वतंत्र बालविभाग असल्यामुळे त्यात किशोर, चांदोबा, संगणक, विज्ञान, सामान्यज्ञान, खेळता-खेळता शिकणे अशाप्रकारच्या वैविध्यपूर्ण वाचनसाहित्याचा समावेश आहे.

धार्मिक साहित्याची आवड असणाऱ्यांकरिता भविष्यकथन, शिवस्तुती, रामायण, महाभारत, दत्तप्रबोध अशा प्रकारचे धार्मिक साहित्य सुध्दा उपलब्ध आहे. विविध शैक्षणिक पातळीवर कार्य करणारे वाचक यांत प्रामुख्याने खगोलशास्त्र, डॉक्टर, वकील, तंत्रज्ञ इ. चा समावेश होतो. भाषाशास्त्र, ललितसाहित्याचे प्रमाण विशेषत: मराठी भाषिक वाचनसाहित्याचा वापर करणारे वाचक जास्त असल्यामुळे त्या वाचकांसाठी मराठी

विषयांतील तज्ञ मंडळींकडून मान्य केलेले साहित्य याशिवाय वाचकांच्या मागणीनुसार असलेले साहित्य वाचनालय खरेदी करते.

**नवीन इमारत प्रकल्पाविषयी -**

राजाराम वाचनालयाची स्थापना १८६९ मध्ये झाली. परंतु राजाराम सीताराम दिक्षित नावाच्या गृहस्थांनी १८९५ साली १००० रु. देणगी दिल्यानंतर या वाचनालयास नेटीव्ह वाचनालय जाऊन राजाराम वाचनालय झाले. १९९५ ला शताब्दी वर्ष साजरे करण्याचे ठरविले. वाचनालयाचे वाढते उपक्रम आणि वाचनालयाचे समाजाच्या दृष्टीने चालविण्यांत येणारे कार्य हा महत्त्वाचा भाग लक्षात घेऊन वाचनालयाच्या शताब्दी निमित्त झालेल्या उद्घाटन समारोहप्रसंगी तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. मनोहर जोशी यांनी वाचनालयाला २.५ चटईक्षेत्र जाहीर केले आणि वाचनालयाला स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने २.५ पैकी १ चटईक्षेत्र हे व्यावसायिक संकुलासाठी आणि १.५ हे वाचनालयाच्या उपयोगासाठी द्यावे असा सरकारी आदेशही काढला. या वाचनालयाबरोबरच महाराष्ट्रातील इतर शताब्दी पूर्ण केलेल्या ३७ वाचनालयांना देखील २.५ चटई क्षेत्र मिळाले. वाचनालयाने शताब्दी पूर्ण केल्याबद्दल आणि नवीन संकुल तयार करण्याच्या दृष्टीकोनातून इमारत बांधण्याच्या दृष्टीने अडचण येऊ नये म्हणून या वाचनालयाच्या इमारतीला भाडे नियंत्रण नियमांतून देखील मुक्त केले. तसेच या वाचनालयाबरोबरच अन्य ३७ वाचनालयांना त्यांच्या वापरात असलेल्या जागेवर महानगरपालिका करांतून माफी देखील जाहीर केली.

वाचनालयाने भव्य पाच मजली इमारत बांधण्याचा संकल्प सोडला. आणि त्या संकल्पा पैकी तीन मजली इमारत आजपर्यंत बांधून आपली यशस्वी घोडदौड पुढे चालू ठेवली आहे.

महाराष्ट्रांतील सर्वात जुने वाचनालय असून या वाचनालयाचा संबंध फक्त महाराष्ट्रापुरताच न राहता आता परदेशांत सुध्दा झालेला आहे. या वाचनालयाकरिता परदेशांतून सुध्दा देणग्या येऊ लागल्या आहेत. अशाप्रकारे सार्वजनिक वाचनालयांना नेहमी जाणवणाऱ्या आर्थिक टंचाईचा विचार लक्षांत घेता या वाचनालयांच्या कामाचे मोल अनन्यसाधारण आहे असे दिसून आले. यावरुन या सार्वजनिक वाचनालयाची महत्ता किती महत्त्वपूर्ण आहे व या वाचनालयाच्या दशकांतील विकासाचा आढावा या प्रगतीवरुनच दिसून येतो.

शासनाच्या सार्वजनिक वाचनालयांच्या उदासीन धोरणांचा विचार करता या वाचनालयास योग्यप्रकारे आर्थिक सहाय्य मिळाले तर या वाचनालयाच्या साहित्याचा जास्तीत -जास्त उपयोग संशोधक आणि अभ्यासकांना करुन घेता येईल.

राजाराम वाचनालय दुर्मिळ साहित्य आणि संदर्भ साहित्याकरिता फार पूर्वीपासूनच प्रसिध्द आहे असे वाचनालयांतील अहवाल वाचितले असता लक्षांत आले. संदर्भसाहित्याचा वापर करण्यासाठी बाहेर गावांहून सुध्दा अभ्यासक मंडळी या वाचनालयांस भेट देतात. आचार्य पदवी प्राप्त करणारे विद्यार्थी विशेषत्वाने या ठिकाणी येतात.

वाचकांना हे वाचनालय निरनिराळ्या नियतकालिके, वृत्तपत्रे आणि मासिके या वाचनसाहित्याबरोबर समाज जागृती करण्याच्या हेतूने वाचनालय संगीताचे कार्यक्रम, नामांकित लेखकांचे त्यांच्या साहित्याबद्दलचे विचार, चर्चा, परिसंवाद इ. आयोजित करुन लोकशिक्षणाच्या कार्यास हातभार लावण्यासाठी प्रयत्नशील आहे. वाचनालयांत होणाऱ्या गणेशोत्सवांत तर महाराष्ट्रातील विविध विभागांतून सुध्दा नामवंत मंडळींना आमंत्रित करण्यात येते. व त्यांनी व्यक्त केलेल्या विचारांच्या माध्यमातून इतरांना नवीन गोष्टींचा बोध होऊन हे वाचनालय सामाजिक योगदानाचे मोठे काम करीत आहे असेच दिसून

येते. आणि या वाचनालयाच्या बाबतीत अभिमानाची बाब म्हणजे की, असे महत्त्वपूर्ण काम वाचनालय सातत्याने गेली १०० हून अधिक वर्षे करीत आहे.

राजाराम सीताराम दिक्षित वाचनालयातर्फे चालविण्यांत येणाऱ्या ग्रीष्मकालीन अभ्यासवर्गांचा आणि पी. एम. टी. आणि नेट, सेट इ. तांत्रिक अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या प्रमाणांत लाभ घेत आहेत असे दिसून आले व नेट अनेक विद्यार्थी ही परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. अशाप्रकारे सध्याच्या काळांतील या शैक्षणिक अभ्यासक्रमांबद्दल, त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल हे वाचनालय जागृत आहे असे दिसून येते. विद्यापीठात सुध्दा अशाप्रकारची मार्गदर्शनाची सोय वाचनालयाने उपलब्ध करून देऊन या वाचनालयाने एक नवीन पायंडा पाडला आहे.. **कार्लाईलने म्हटल्याप्रमाणे वाचनालय हे खऱ्या विद्यापीठ आहे असे वाटते.** एकेकाळी नागपूर शहराच्या मध्यवस्तीत परंतु कुठल्याही व्यापारी प्रतिष्ठानांनी न घेरलेले वाचनालय आता मात्र छोट्या-छोट्या अतिक्रमणांनी झाकले जात होते, परंतु कार्यकर्त्यांनी त्यावर मात करून बहुमजली इमारत बांधण्याचा चंग बांधून तो पूर्णही होत आहे. यासाठी वाचनालयाचे कार्यकर्ते अभिनंदनास पात्र आहेत असे म्हणावेसे वाटते.

सार्वजनिक वाचनालयांच्या आर्थिक बाबतीत उदासीन धोरणाबद्दल माहिती असतानां सुध्दा या वाचनालयांतील कार्यकर्ते आणि वाचनालयांतील कार्यकारणीचे सभासद वाचनालयाकडून कोणत्याही प्रकारचे आर्थिक मूल्य न आकारता या वाचनालयाच्या कार्यासाठी सतत झटत आहेत असे दिसून येते. ही एक आनंददायक बाब आहे. व समाजकार्य करण्याच्या हेतूने हे कार्यकर्ते झटत आहेत.

राजाराम सीताराम दिक्षित वाचनालयाने माहिती आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांतील वाढत्या प्रगतीच्या दृष्टीने समाजातील जास्तीत-जास्त लोकांना संगणकाविषयी माहिती प्राप्त व्हावी या उद्देशाने संगणक विभाग वाचनालयाच्या इमारतीतच सुरू केला आहे. या ठिकाणी अतिशय कमी मूल्य आकारून विशेषतः बाल आणि महिलांना संगणक प्रशिक्षण देण्यात येते. व संगणकाविषयी अभ्यासक्रम सुध्दा चालविण्यात येतो. वाचनालयाने आतापर्यंत माहिती पुरविलेले अनेक लोक संगणकाचे मार्गदर्शन करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारता संगणकाचे प्रशिक्षण देतात. अशाप्रकारे कार्यकर्ते या वाचनालयात लाभले आहेत हे विशेषतः नमूद करावेसे वाटते.

शताब्दी पूर्ण केलेले आणि समाजाच्या दृष्टीने विविध प्रकारचे उपक्रम राबवून सामाजिक क्षेत्रांत वाचनाचे आणि वाचनालयाचे स्थान टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणारे असे राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय एक उत्कृष्ट सार्वजनिक वाचनालय म्हणून कार्य करीत आहे असे निश्चितच म्हणावेसे वाटते.

**कु. मेधा हेमंत खरे**

२९/बी. ध्यानसिंग लॉजच्या बाजूला,

गिरिपेठ, नागपूर - १०

**दिशा**

**लेखन सहकार्यासाठी आवाहन करीत आहोत.**

**संपर्क : ५३३ ७६७२**

# 'मनाचा विकास व ईश्वरभक्ती'

आपल्या सर्वांनाच ठाऊक आहे की, मनाचे विश्लेषण करण्याचे काम डॉ. सिगमंड फ्रॉईड ह्यांनी केले आहे. मनाची गुंता-गुंता होऊन अनेक पेच-प्रसंग निर्माण होतात, अनेक नाती-गोती, संबंध दुरावतात-जुळतात वगैरे. पण फ्रॉईडच्या अनेक वर्ष आधीच श्री. व्यासांनी श्रीमद्भागवत पुराणात, महाभारतातील गीते द्वारे व उपनिषदात मनाचे महत्त्व पटवून दिले आहे. महाभारतात श्री. व्यासांनी 'मनच मनुष्याच्या बंध व मोक्षाला कारणीभूत आहे'. असे म्हटले आहे. मनाचे सामर्थ्य दाखवूनच श्रीकृष्णाने अर्जुनाला धर्मयुध्दास प्रवृत्त केले. मनातील गुण-दोष कसे निर्माण होतात व ते कसे घालवावेत हे सुध्दा श्री कृष्णाने अर्जुनाला गीतेत वारंवार सांगितले आहे. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर हेच मनाला दूषित करतात तर श्रध्दा, भक्ती हे माणसाला ह्या दोषांपासून दूर ठेवण्यास मदत करतात. विष्णु पुराणात अध्याय ५ वा श्लोक ३-४ मध्ये मानसिक तापांना उदा. काम, क्रोध वगैरांना ''आध्यात्मिक ताप'' असेच म्हटले आहे व ह्या तापातून सुटका म्हणजेच भक्ती होय. श्री. समर्थ रामदासांनी तर मनाचे माहात्म्य जाणूनच मनाचे श्लोक रचलेले आहेत. ह्यावरुन एकच गोष्ट स्पष्ट होते की, मन हे प्रत्येक माणसाला चांगले अथवा वाईट काम करायला लावण्यास भाग पाडते. मन हे चंचल आहे व ते वाऱ्यासारखे सुसाट धावते हे तर गीतेत सांगितलेलेच आहे. अशा ह्या मनाला ताब्यात आणून, काम, क्रोध, लोभ मद मत्सर, निंदा ह्या सहा शत्रूंपासून सुटका कशी करायची? ह्यावर काही उपाय आहे का ? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्याला गीतेतून तर मिळतातच पण श्रीमद्भागवतात श्री नवविधा भक्ती सप्तमस्कंध, ५ वा अध्याय व श्लोक २३ मध्ये सांगितली आहे तीच पुढे श्री रामदासांनी दासबोधात मांडली आहे. तो श्लोक असा आहे.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्।
अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ २३ ॥

भक्ती हा शब्द भज ह्या संस्कृत धातू पासून तयार झाला ह्याचे अनेक अर्थ आहेत -मुख्य अर्थ-निष्ठा, श्रध्दा, पूजा, वाटणे, देणे, प्रेम वगैरे. पण नुसतेच प्रेम असा अर्थ ह्यात अभिप्रेत नाही. अशी ही भक्तीची व्याख्या आहे. वरील श्लोक ह्या सर्व अर्थांचे एकत्रीकरण करून आपल्याला मानसिक व आत्मिक उंची गाठण्यासाठी मदत करतो. माझ्या मते - १) श्रवण २) कीर्तन ३) स्मरण ४) पादसेवन ५) अर्चन ६)वन्दन ७) दास्य ८) सख्य ९) आत्मनिवेदन विष्णुचे करायचे. ह्या एकेक पायऱ्या आहेत असे वाटते. हळूहळू मनाची चंचलता, दुर्बलता व सहा रिपुंना काबूत आणण्यास मदत करतात. कसे ते थोडक्यात पाहू. प्रथम माणूस विचार करताना जे ऐकले आहे त्यापासूनच सुरुवात करतो. एखादया बद्दल चांगले अथवा वाईट ऐकले की तसे चांगले किंवा वाईट विचार हळूहळू कमी होतील. नंतर विष्णुचेच कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वन्दन, त्याचेच दास्य व त्याच्याशीच सख्य अशा तऱ्हेने त्याचेच ज्ञान मिळूनच कर्म करणे हीच खरी भक्ती. कुठल्याही क्षेत्रात सखोल ज्ञान घेणे व विकास साधणे हेच अपेक्षित असते. त्याकरिता मनाचा निर्मळ पणा, मोठेपणा आवश्यक असतो. तो आत्मनिवेदनाद्वारे मिळतो. यथा हं ! कसा ते स्वतःच्या कार्याचा स्वतःशीच विचार व तो एका जगातील श्रेष्ठ देवापुढे मांडायचा आहे ही कल्पनाच मनाला चांगले काम करण्यास प्रवृत्त करते. मग उरते ती फक्त भक्तीच !

डॉ. सौ. गीता कुलकर्णी
अ - ३०६, मिशी अपार्टमेंटस,
अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६९
दूरध्वनी - ८२४ १९००

# पुनर्जन्म, अफगाणिस्तानचा !

*बिन लादेन ही वृत्ती भारतात निर्माण होईल का ? का होणार नाही ? या मुद्यांच्या अनुषंगाने अफगाणिस्तानचा पुनर्जन्म विषयी विचार मांडणारा लेख.*

ओसामा बिन लादेन जिवंत आहे का मेला याबद्दल किंवा तो अफगाणिस्तानामध्येच आहे का पाकिस्तानामध्ये आहे की आणखी कुठल्या देशामध्ये आहे या बद्दल कोणतीही अधिकृत माहिती कोठेही उपलब्ध नाही. कदाचित लादेनचा मृत्यू झालेला असेलही. तसे असेल तर अमेरिकन सैन्य लादेनचा शोध घेण्याचा प्रयत्न काही काळाने सोडून देतील.

कदाचित लादेन पाकिस्तानमध्ये लपला असेल. पण त्याने काही सिद्ध होईल असे वाटत नाही, कारण पाकिस्तान सरकार, म्हणजे जनरल मुशर्रफ आणि कंपनी हे हे कधी मान्यच करणार नाहीत. उलट बिन लादेनचे अस्तित्व त्यांना त्रासदायकच ठरेल. कदाचित ते स्वत:सुद्धा बिन लादेनला अल्लाघरी, पुढच्या प्रशिक्षणासाठी पाठवतील. कदाचित लादेन दुसऱ्या कोणत्यातरी देशात लपला असेल. पण तो पुन्हा कधीही शक्तिशाली होऊ शकणार नाही.

बिन लादेन जिवंत असेलमुद्धा, पण तो आता कोणालाही नको आहे. अमेरिकेचा राग कोण ओढवून घेईल?

प्रश्न बिनलादेनच्या जगण्याचा किंवा मरण्याचा नाही. प्रश्न आहे बिन लादेन अस्तित्वात आलाच कसा याचा ! आणि अर्थात पुन्हा कधी बिन लादेन सारखा पैदा होणार नाहीना याचा. सन १९७९ मध्ये सिव्हील इंजिनिअरिंगची पदवी संपादन केल्यावर त्याने वडिलांच्या व्यवसायात लक्ष घातले होते. म्हणजे थोडक्यात तो रांकेला लागला होता. पण मग असे काय झाले असावे ज्यामुळे हा नवयुवक शस्त्रास्त्रांच्या दुनियेत आपणहून शिरला ?

आतापर्यंत प्रत्येक वेळी इतिहासाने स्वत:च्या नावाची दहशत निर्माण करणारी माणसे त्यांच्या अतिरेकी परिस्थितीतून बनलेली असतात. हे दाखवून दिले आहे. हिटलरची एक अत्यंत प्रसिध्द गोष्ट आहे. मुसोलिनी आणि हिटलर यांच्या ऐतिहासिक भेटीमध्ये एकदा मुसोलिनीने कागदावर लिहीले. इतिहास माणसे घडवतो. यावर लगेच आपली मतभिन्नता दर्शवून हिटलरने लिहीले, माणसे इतिहास घडवतात. अर्थात इतिहास घडवणारी माणसे इतिहासानेच घडविलेली असतात हे तो विसरला. भारतातसुध्दा इतिहास घडवणारा जर्नेलसिंग भिंद्रानवाले हा अनुकूल परिस्थिती मुळेच वर आलेला होता. आणि नेमके तेच लादेनच्या बाबतीत घडले आहे. ही अशी माणसे एका विशिष्ट वेळी एका विशिष्ट स्थळीच निर्माण होऊ शकतात. हिटलर अमेरिकेत कधीच निर्माण होऊ शकला नसता. तो फक्त तत्कालिन जर्मनीमध्येच निर्माण होऊ शकला. बिनलादेन हा केवळ अफगाणिस्तानमध्येच निर्माण होऊ शकला. अफगाण समाज हा अत्यंत दडपशाही समाज आहे. धर्म, वर्ण, वंश, लिंगभेद या सर्व गोष्टींच्या आधारावर अफगाणिस्तान मध्ये सतत दडपशाही चालूच होती. त्यातून शीतयुद्धाचा परिणाम म्हणून तुकडे तुकडे झालेले रशियाचे सीमवर्ती प्रांत, त्यामध्ये असलेले रशियन सैन्याचे अस्तित्व, पराभूत होऊन बाहेर पडणाऱ्या रशियन सैन्याचे अत्याचार त्यामुळे दुखावली गेलेली धर्मभावना यासारखी परिस्थिती अतिरेकी वृत्तीच्या माणसांसाठी पोषक असते. या सर्व राक्षसांचे वैशिष्ट असे की हे अत्यंत पद्धतशीरपणे सत्तेवर

येतात, अनेकदा तर सनदशीर मार्गाने सत्ता बळकावतात. लादेन हा अचानक उदयास येऊन एका रात्रीत हजारो माणसांचा नेता झालेला नाही. तो सर्व प्रथम एक उद्योगपती होता. नंतर रशियन सैन्याचा प्रतिकार करण्यासाठी एकत्र आलेल्या संघटनेचा, मुजाहिदीनचा तो एक सदस्य बनला. लादेनकडे अतिशय आकर्षक व्यक्तिमत्त्व असले पाहिजे. कारण त्याच्याकडे मुजाहिदीनचे नेतृत्त्व स्वत:हून चालत आले. आपला व्यवसाय सांभाळूनच त्याने 'जेहाद' साठी, धर्मयुद्धा साठी एकत्र आलेल्या व्यक्तिंचे आणि संस्थांचे जाळे 'अल क्वैदा' उभे केले. पराभूत रशियन सैन्याचे अत्याचार लादेनने पाहिल्यामुळे विजेत्या अमेरिकेची त्याला कदाचित भीती वाटली असावी. पराभूत असून रशियनांचे अत्याचार इतके असतील तर विजेते अमेरिकन किती करतील असा विचार त्याने केला असावा. ''अल क्वैदा'' च्या कार्यासाठी आणखी पैसा उभारण्यासाठी हिऱ्यांचा अवैध व्यापार त्याने सुरू केला. लादेनच्या कृत्यांची पूर्ण माहिती असूनसुध्दा त्याचे हिरे स्वस्त पडतात म्हणून युरोपात विकले गेले. त्याच्या अमेरिका विरोधी धोरणाला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीने उत्तेजनच दिले गेले. बिन लादेन हा त्याला पैसा पुरवण्यावर उलटला तर त्यात विशेष वाटायचे काही कारण नाही.

असो ! अफगाणिस्तानमध्ये एक अत्यंत टोकाची परिस्थिती उद्‌भवल्यामुळे एक अत्यंत कार्यकुशल उद्योगपती अत्यंत हिंसाचारी बनला. भारतामध्येही अनेक दहशतवादी संघटना आहेत. काश्मीर, आसाम, महाराष्ट्र-कर्नाटक-आंध्रप्रदेशच्या सीमेवर असलेले नक्षलवादी, वीरप्पन सारखे गुन्हेगार, मुंबईमधले आंतरराष्ट्रीय टोळीवाले-गोळीवाले इत्यादी. पण कितीही झाले तरी अफगाणिस्तान इतकी परिस्थिती भारतात नक्कीच नाही. भारतीय मन हे अत्यंत सहिष्णु आहे. त्यामुळे चेकाळून जाऊन हिंसा करणे हे भारतीयांच्या रक्तातच नाही. उलट आपली तक्रार आहे की आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेकदा हिंसा करून भारताने आपली ताकद दाखवणे आवश्यक असूनही भारत तसे करत नाही. भारतीयांची शक्ती ही क्रिकेटच्या मैदानावर हार खाण्यातच. म्हणून भारतात कधीही भिंद्रानवाले किंवा लादेन पुन्हा होऊ शकणार नाहीत.

तालीबान ही ''अल क्वैदा'' नेटवर्क मधली अफगाणिस्तानवर अंतर्गत नियंत्रण ठेवणारी संघटना आहे. या संघटनेची पकड संपलेली आहे. आता अफगाणिस्तानमध्ये नवीन प्रशासन सुरू होईल. जशी आज भारताची अवस्था आहे तशी अफगाणिस्तानची होईल. प्रचंड बेकारी, अशिक्षितता, दडपशाही मनोवृत्ती, भ्रष्टाचाराला चटावलेल्या सरकारी व निमसरकारी यंत्रणा यांमुळे अफगाणिस्तानचे नाव भ्रष्टाचारमध्ये भारताच्याही वर येईल. पण या देशाची हळूहळू का होईना प्रगती होईल.

तमाम शंभर आणि वरती कितीतरी कोटी भारतीयांतर्फे नुकत्याच पुनर्जन्म झालेल्या या राष्ट्राला नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.

**वासुदेव देशपांडे**
सुचेता, भास्कर कॉलनी,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

पुस्तक म्हणजे नेहमीच तत्पर असलेले मित्र व सल्लागार आहेत. तुम्हांला तोंडी सल्ला देणारे तुमचे हितचिंतक तुमच्या जीवनात कदाचित डोकावू पाहतील, पण पुस्तके तसे करणार नाहीत. पुस्तक नेहमी केव्हाही सल्ल्यासाठी उपलब्ध असतात, म्हणून ते तोंडी सल्लागारापेक्षा श्रेष्ठ आहेत. पुस्तके त्यांचा सल्ला तुम्हाला हवे असेल तितक्या वेळा पुन:पुन्हा देऊ शकतात.

# परिसर वार्ता

सौ. आनंदीबाई केशव जोशी इ. मि. स्कूल चे वार्षिक स्नेहसंमेलन दि. २१, २२, २३ डिसेंबर २००१ रोजी संपन्न झाले. २१ व २२ डिसेंबरला ५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी विविध करमणुकीचे कार्यक्रम सादर केले.

रविवार २३ डिसेंबर २००१ हा वार्षिक सोहळ्याचा अंतिम दिवस होता. पर्यवेक्षिका सौ. तेजस्विनी तेलंग यांनी प्रास्तविक केले. त्यानंतर दीपप्रज्वलनाने कार्यक्रमास सुरूवात झाली. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली व अहवाल वाचन केले. अहवालातील ठळक बाबी -

१) सतत ७ वर्षे इ. दहावीचा १०० % निकाल.

२) ३ विद्यार्थ्यांना M. T. S.

३) ४ विद्यार्थ्यांना N. T. S.

४) २ विद्यार्थ्यांना इ. ७ वी ची स्कॉलरशिप.

शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सायन्स प्रकल्पाची राष्ट्रीय स्तरावर निवड. हिंदी, मराठी, ड्रॉईंग, भूगोल इ. अनेक विषयांमध्ये विद्यार्थ्यांना आंतरशालेय स्तरावर बक्षिसे.

५) आकाशवाणी मुंबई केंद्राने आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषेत शाळेच्या ८ वी च्या विद्यार्थ्यांचा गट विजयी.

६) दूरदर्शनवरील अल्फा स्कॉलर प्रश्नमंजुषेत सहभाग.

७) आदर्श शिक्षक पुरस्कार - ब्राह्मण सेवा संघ - हरदीप कौर सुलार. रोटरी क्लब - स्नेहल फाटक, कमल महेश्वरी.

८) शाळेतील शिशुवर्गासाठी 'हसत खेळत शिक्षण' पद्धतीचा अवलंब.

शाळेतील विश्वासू व इमानदार शिपाई बाळू रावडे यांचे निधन.

ह्या वर्षाच्या स्नेहसंमेलनासाठी प्रा. रत्नाकर धारकर (M.S.C.इलेक्ट्रॉनिक्स) हे प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. ते विल्सन कॉलेजमधे सायन्स आणि तंत्रज्ञानाचे हेड ऑफ द डिपार्टमेंट होते. फिजिक्स ऑलिंपियाड साठी ही ते मार्गदर्शन करतात. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले, आपल्या जबाबदाऱ्यांचा, ज्ञानाचा दैनंदिन जीवनात नीट उपयोग केला जात नाही. तसेच आपण नागरिकत्वाच्या नियमांचे ही नीट पालन केले पाहिजे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी ही नागरिकशास्त्राच्या रोजच्या जीवनातील वापरावर भर दिला. विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे लक्ष देऊन आई-वडिल व शिक्षकांना समाधान द्यावे असे सांगितले.

त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विविध विषयात प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थी ज्याची आतुरतेने वाट बघत होते ते मनोरंजनाचे कार्यक्रम झाले. त्यासाठी परीक्षक म्हणून सौ. मुर्डेश्वर व शिल्पा नायगुडे यांनी काम पाहिले. संस्थेचे पदाधिकारी श्री. करंदीकर, श्री. दिलीप जोशी, श्री. मा. य. गोखले यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा आणि वर्षभर विद्यार्थी ज्याची वाट बघत असतात असा हा शाळेचा वार्षिक सोहळा चढत्या श्रेणीने, शिस्तीच्या वातावरणात, उत्साहात आणि आनंदात पार पडला.

मैत्रेयी शेवडे
(सौ. आनंदीबाई के. जोशी इ. मि. स्कूल)

**वाचाल तर वाचाल -बालमोहन मध्ये व्याख्याने -**

मुंबई येथील शिवाजी पार्क विभागातील बालमोहन विद्यामंदिर या प्रसिध्द शाळेत दि. १३ जानेवारी रोजी ठाण्यातील प्रसिध्द समाज कार्यकर्त्या, मनसुधा अकादमीच्या प्रमुख श्रीमती लीलाताई जोशी व बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक यांची बालमोहनच्या पालकांसाठी 'वाचाल तर वाचाल' या विषयावर दोन सत्रात व्याख्याने झाली. बालमोहन विद्यामंदिराचे हे हीरक महोत्सवी वर्ष असल्याने गेले दोन महिने पालकांसाठी पाल्य संगोपनाच्या दृष्टीने विविध विषयांवरी व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

रविवार १३ जानेवारीच्या दोन्ही सत्रास शाळेचे विश्वस्त माननीय बापूसाहेब रेगे उपस्थित होते. प्रा. मोहन पाठक याच शाळेचे माजी विद्यार्थी आहेत. आपल्या वाचन प्रवासाची सुरुवात याच शाळेच्या ग्रंथालयात झाल्याचे सांगून मुलांना वाचते करण्यासाठी काय काय करता येण्यासारखे आहे याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. श्रीमती लीलाताई जोशी यांनी वाचनाचे महत्त्व विषद करून पुस्तके नसलेली घरे म्हणजे तुरुंगच होय हा विचार स्पष्ट केला.

या व्याख्यान मालेतील सर्व व्याख्यानांचे शाळा पुस्तक काढणार असल्याची माहिती बापूसाहेब रेगे यांनी दिली.

**बांदोडकर महाविद्यालयाचा पारितोषिक वितरण समारंभ -**

"आज मूल्यांचा झपाटाने ऱ्हास होताना दिसत आहे. अशा समाजात चारित्र्य जपणे अतिशय महत्त्वाची बाब आहे." असे उद्गार वझे एज्युकेशन ट्रस्ट च्या मुलुंड येथील वझे-केळकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. आर. कुरुप यांनी बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या पारितोषिक वितरण समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना काढले. महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झालेल्या या समारंभास विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर उपाध्यक्ष श्री. वि. करंदीकर, कोषाध्यक्ष श्री. माधवराव गोखले, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. गो. कि. कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते.



डॉ. वा. ना. बेडेकर यांचे स्वागत करताना प्राचार्य सी. जी. पाटील

समारंभाची सुरुवात शीतल शेंड्ये हिने सादर केलेल्या स्वागत गीताने झाली. त्यानंतर भारत गौरव गीत सादर करण्यात आले. प्रमुख पाहुणे डॉ. कुरुप व अध्यक्ष वा. ना. बेडेकर यांचे पुष्पगुच्छ देऊन प्राचार्य सी. जी. पाटील यांनी तर श्री. वि. करंदीकर यांचे पुष्पगुच्छ देऊन उपप्राचार्य डॉ. सौ. माधुरी पेजावर यांनी स्वागत केले. डॉ. सौ. पेजावर यांनी प्राचार्य एम् . आर. कुरुप यांचा परिचय करून दिला तर प्राचार्य सी. जी. पाटील यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर केला. डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या अध्यक्षीय भाषणानंतर पारितोषिक वितरण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रकाश माळी यांनी केले तर आभार प्रदर्शन कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. मकरंद दिक्षित यांनी केले.

**बांदोडकर कला व नाट्य मंडळ-**

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या या शैक्षणिक वर्षातील उपक्रमांची सुरूवात प्रश्नमंजुषा व निबंध स्पर्धेने ऑगस्ट च्या सुरूवातीस झाली. त्यानंतर झालेल्या वक्तृत्व स्पर्धेसही उत्तम प्रतिसाद मिळाला. विक्रांत भारद्वाज हा कलामंडळाचा विद्यार्थी कार्यवाह तर नफिसा मोपारी, केतन कांबळे व आकाश भोईर सह कार्यवाह म्हणून निवडण्यात आले.

मुंबई विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धात १० हून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रा. डॉ. श्रीमती मुळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी विद्यार्थी विजु माने, जॉर्ज क्लिफोर्ड, भालचंद्र गायकवाड, संतोष सराफ यांनी नाट्य विषयक उपक्रमांसाठी सहकार्य केले. इनरव्हील व रोटरी क्लबच्या एकांकिका स्पर्धांत महाविद्यालयास 'काळी होती नकटी एक' या एकांकिकेसाठी तृतीय पारितोषिक मिळाले. याच एकांकिकेस राज्य स्तरीय एकांकिका स्पर्धेस (सायन येथील सुशीलकुमार संस्थेने आयोजित केलेल्या) प्रथम पारितोषिक मिळाले. परेश मेहता व राखी हळदणकर यांना उत्तेजनार्थ पारितोषिक याच एकांकिकेसाठी मिळाले. दादर येथील देववाणी मंदिराच्या गायन स्पर्धेत महाविद्यालयाची शीतल शेंडे ही यशाची मानकरी ठरली. शिक्षक दिनानिमित्ताने १४ सप्टेंबर रोजी शिक्षकांसाठी स्पर्धा घेण्यात आल्या.

४ ऑगस्ट रोजी कथाकथन स्पर्धा झाली. ऑक्टोबर मध्येच आय. एन. टी. त सादर झालेल्या एका परीची कहाणी -'अ फेअरी टेल' या ४० विद्यार्थ्यांचा सहभाग असणाऱ्या एकांकिकेस वेशभूषेसाठी पारितोषिक मिळाले.

दुसरे सत्र - शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सत्राच्या सुरूवातीसच निहार मयेकर याने वि. प्र. मंडळाच्या वाळू वाको संगीत व वाद्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला.

थोरले बाजीराव पेशवे सभागृह 'आकांक्षा' या वार्षिकउत्सवासाठी लहान असल्याचा येणारा अनुभव लक्षात घेऊन यंदा प्रथमच महाविद्यालयांच्या मागील बाजूस मंडप घालून 'आकांक्षा २००१' हा उत्सव साजरा झाला. या निमित्ताने इन्फर्मेशन मेळा देखील आयोजित केला गेला.

१८ व २४ डिसेंबर या दरम्यान झालेल्या या वार्षिक उत्सवात रांगोळी, मेंहदी, पुष्परचना, छायाचित्र, शुभेच्छा पत्र, व्यंगचित्र इ. अनेक प्रकारच्या स्पर्धा झाल्या. अंताक्षरी व व्यक्तिमत्व स्पर्धेस विद्यार्थ्यांचा मिळालेला प्रतिसाद लक्षणीय होता. फॅशन शो, फिश पॉड, रोझ डे इत्यादी चे ही विद्यार्थ्यांना आकर्षण होते. 'माँ तुझे सलाम' हा कार्यक्रम सर्वोत्कृष्ट ठरला.

या सर्व यशस्वी आयोजनास डॉ. आर. पी. आठल्ये व त्यांचे समितीतील सहकारी यांचे नेतृत्व व प्राचार्य सी. जी. पाटील, उपप्राचार्य डॉ. सौ. पेजावर (पदवी) व प्रा. मकरंद दिक्षित (कनिष्ठ) यांचे मार्गदर्शन लाभले होते.

**लक्ष्मी चेंगलाचे यश-**



लक्ष्मी चेंगला

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातून संशोधनाद्वारे पदव्युत्तर पदवी मिळविण्यासाठी लक्ष्मी श्रीस्वामी चेंगला या विद्यार्थीनीने सादर केलेला प्रबंध मुबई विद्यापीठाने स्वीकारला असून तिला एम्. एस्. सी (बाय रिसर्च) ही पदवी प्रदान केली आहे.

वनस्पतिशास्त्र विभागातील प्रपाठक, डॉ. नागेश टेकाळे यांच्या मार्गदर्शनाखाली तिने संशोधन केले. वाडा मोखाडा या क्षेत्रातील वारली जमातीतील कुपोषणाच्या संदर्भात अपारंपारिक पालेभाज्यांमधील 'बी कॅरोटीन चे कंटेंटस्' हा तिच्या संशोधनाचा विषय होता.

या संदर्भात वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. व्ही. व्ही. अंबिके, महाविद्यालयाचे प्राचार्य सी.जी. पाटील यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याबद्दल तिने कृतज्ञता व्यक्त केली.

**नवरंग - प्रतिवर्षाप्रमाणे उत्साहाची पर्वणी -**

विद्या-प्रसारक मंडळाच्या कला-वाणिज्य महाविद्यालयांचा वार्षिकोत्सव नवरंग २४ डिसेंबर व २,३,४ जानेवारी या कालावधीत संपन्न झाला. पूर्वी आठवडाभर चालणारा हा नवरंगाची उधळण करणारा सांस्कृतिक उत्सव यावर्षी चारच दिवसात आटोपला गेला. मात्र हे चार दिवसही महाविद्यालयाच्या वातावरणात रंगत भरून गेले.

फ्लॉवर डेकोरेशन, सलॅड डेकोरेशन, हेअर स्टाईल, व्यक्तिमत्व स्पर्धा, वाद-विवाद, मेहेंदी स्पर्धा अशा विविध स्पर्धा या चार दिवसांत नाचगाण्याच्या धुंदीत पार पाडल्या. त्यात प्रमुख आकर्षण अर्थात नेहमीप्रमाणे ठरले ते टाय-सारी डे आणि रोझ डे या दोन्ही दिवशी विद्यार्थिनी रंगीबेरंगी साड्यांपासून आधुनिक वस्त्रप्रावरणांमध्ये, नटून-थटून आलेल्या होत्या. त्यांच्यावर छाप पाडण्याच्या प्रयत्नात तरुणही उत्साहाने जमेल तसे टायसह किंवा थ्रीपीसमध्ये दिसत होते. ठाणे महाविद्यालयाचा सारा परिसर तरुणाईने फुलून गेला होता. जणूकाही शहरातील सारे तारुण्य, उत्साह महाविद्यालयाच्या प्रांगणात एकत्रित झाला होता.

महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळाही त्याच उत्साहात पार पडला. ज्येष्ठ कलावंत भारती आचरेकर प्रमुख पाहुण्या लाभलेल्या या सोहळ्यात महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थी प्राध्यापक वृंदाला बक्षीसांनी गौरवण्यात आले.

विद्या-प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर, उपाध्यक्ष अण्णासाहेब करंदीकर, प्राचार्य स. वा. गोखले आदी सोहळ्यात उपस्थित होते. नवरंगाच्या प्रमुख प्रा. लीला भट यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

या सोहळ्यात तत्त्वज्ञान या विषयात विद्यापीठात प्रथम आलेली महाविद्यालयाची सुवर्णपदक विजेती मीरा शर्मा, बी. लीब अभ्यासक्रमात विद्यापीठात चौथ्या स्थानावर आलेली स्वप्ना देसाई, आरती थिटे या विद्यार्थीनींचा गौरव करण्यात आला. त्याशिवाय वर्षभरात विविध कला-क्रीडा स्पर्धांमध्ये प्रावीण्य मिळवलेल्या २६ विद्यार्थ्यांना ही गौरवण्यात आले. प्रमुख पाहुण्या भारती आचरेकर यांनी या सोहळ्यात बोलताना आपल्या महाविद्यालयीन आठवणींना उजाळा दिला. महाविद्यालयातील विद्यार्थी एरवी गोंधळ गडबड करणारा असला तरी येथील विद्यार्थ्यांमध्ये शिस्त असल्याचा निर्वाळा त्यांनी दिला.

प्राचार्य स. वा. गोखले यांनी महाविद्यालयाच्या विविध क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेतला. शैक्षणिक क्षेत्रात महाविद्यालयाची कामगिरी चांगली असल्याचे समाधान व्यक्त करताना कला-क्रीडा क्षेत्रातही महाविद्यालयातील विद्यार्थी अग्रेसर असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. आंतर महाविद्यालयातील स्पर्धांमध्ये महाविद्यालयाला २६ बक्षिसे मिळाली असल्याचे सांगतानाच शैक्षणिक क्षेत्रातील यशस्वीतेला अन्य क्षेत्रातील यशस्वीतेची जोड असायला हवी, असे त्यांनी स्पष्ट केले.

**प्रा. मोहन पाठक**

•••